
# मी नाही जा!

## आणि इतर १० गोष्टी

प्रियंवदा करंडे

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. २६१३



BVBK-0402613

# मी ना ही जा!

प्रियंवदा करंडे

किंमत १० रुपये

जय हिंद प्रकाशन

BVBK-0402613

❀ ति. दादांना व सौ. आईस ❀

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मी नाही जा ! | ०३ |
| चुकलं गं माझं | १० |
| सोनाराने कान टोचले | १९ |
| खोक्यातले बक्षीस | २४ |
| टी. व्ही. वर राजू | २८ |
| भाऊबीज भेट | ३२ |
| नकट्या मनूची गोष्ट | ३८ |
| परीचं राज्य | ४२ |
| ...आणि पोपट बोलू लागला | ४८ |
| 'सारे माझे मी साऱ्यांची' | ५९ |
| बबू | ६० |

# मी नाही जा !

2693

टिल्लू नावाचा एक छोटा मुलगा होता. त्याला एकसारखे खायला आवडे, पण काम करण्याचा कंटाळा येई. त्याचा स्वभाव त्यामुळे आळशी आणि निरुद्योगी झाला होता.

त्याची आई त्याच्यासाठी चणे, कुरमुरे, शेंगदाणे, लाह्या, लाडू असे पदार्थ डब्यातून भरे. टिल्लू येता-जाता खायचा आणि खिडकीतून बाहेर बघत उभा राहायचा. एकदा संध्याकाळी टिल्लू शाळेतील हस्तव्यवसायाचे काम करत बसला होता. त्याने रंगीबेरंगी क्रेप कागदाचे सुरेख फुलपाखरू बनवले. ''बाबा, बाबा, बघा ना!'' पेपर वाचणाऱ्या बाबांना त्याने विचारलं. ''बघू रे,'' त्याच्या धाकट्या बहिणीने - राणीने - म्हटलं. ''शी! माझंच फुलपाखरू छान आहे.'' ती त्याला चिडवत म्हणाली. ''चूप! गणित

सोडवताना बोलायचं नाही.'' टिल्लूने तिला दम भरला. ''ए, रागवू नकोस रे दादा! हे गणित सांग ना!'' ''हूं! मी नाही जा!'' तो ओरडला. त्याच्या आईने मग राणीला गणितं सांगितली. इतक्यात बाबांना एकदम आठवण झाली. कालपासून पोस्टात टाकायची पत्रं खिशातच राहिली होती. ते टिल्लूला म्हणाले, ''टिल्ल्या! जा रे, ही पत्रं पोस्टात टाक.'' ''हूं! मी नाही जा!'' तो पुन्हा ओरडला. ''असं रे काय करतोस? झालं ना फुलपाखरू करून! मग आता खेळायला जाताना वाटेतच तर पोस्टाची पेटी आहे. हो ना? जा बाळ!'' बाबा शांतपणे म्हणाले. तरीही टिल्लू काहीच लक्ष न देता खिडकीत उभा राहून बाहेरची मजा पाहू लागला. बाबा वैतागले. चौथीत शिकणाऱ्या आपल्या मुलाला जराही शिस्त नाही म्हणून ते अगदी चिडीला आले. रागारागाने ते उठले. स्वतःच पत्रं पोस्टात टाकायला निघाले. तशी टिल्लूला आई म्हणाली, ''टिल्लू, शहाणा ना तू? हे बघ, हे किनई रेवती-मावशीचं लायब्ररीचं पुस्तक आहे. तेही दे... परत करायचंय तिला आजच!'' आईने टिल्लूचे लाड करत म्हटलं. पण टिल्लूला एकच गाणं येत होतं. ते म्हणजे ''मी नाही जा.'' तो ओरडला, ''मी नाही जा जाणार! मी फक्त खेळणार आता. सारखी सारखी मला कामं कशाला सांगता?'' टिल्लू क्रिकेटची बॅट उचलून खेळायला निघून गेला.

आई नि बाबा मग आपापली कामं करून आले. दोघेही विचारात पडले की आता या टिल्लूला सुधारायचं कसं? इतक्यात बेल वाजली. राणीची मैत्रीण वर्षा आली होती. राणीशी भातुकली खेळायला. राणीने लगेच अभ्यास ठेवून दिला. वर्षाने येताना गूळ नि खोबरं आणलं होतं खेळणपीठ

म्हणून. ती म्हणाली, ''ए, आज आपण बाहुलीचं लग्न लावणार होतो ना? मी बघ खाऊ आणलाय!'' ''अय्या! खरंच! विसरलेच मी! ए आई, मला कुरमुरे दे! चिकी दे! आज माझ्या बबडीचं लग्न आहे ना?'' राणी आईजवळ जात म्हणाली. आईने तिला एका वाटीत चिकी नि दुसऱ्या वाटीत कुरमुरे दिले. थोड्याच वेळात मिनी, ठकी, चिकी अशा तिच्या मैत्रिणी आल्या. बबडीचे लग्न आता लागणार होते. सारी तयारी झाली. इतक्यात टिल्लू आला. तो खेळ अर्धवटच टाकून आला होता. त्याने आल्या आल्या चणे दाणे खाल्ले नि तो सोफ्यावर बसून राहिला. ''ए दादा, तू भटजी होतोस आमच्या खेळात? अंतरपाट धरशील?'' राणीने विचारलं. ''मी नाही जा! मला कंटाळा आलाय!'' टिल्लू ओरडून म्हणाला. ''ए, ये ना रे दादा! तुला खायलासुद्धा मिळेल.'' ती म्हणाली. ''हॅट! मला नको काही सांगूस!'', टिल्लू चिडून म्हणाला. तशी मग राणीने शेजारच्या विक्रमला बोलावले. विक्रमबरोबर राजूही आला. अमीत आला. सगळ्यांनी लग्नाचा बार उडवला. मग सगळ्यांनी खाऊ खाल्ला. राणी म्हणाली, ''वर्षा, ठकी, आपण बाहुलीचे गाणे म्हणूया? नाच करूया?'' ''होऽऽ'' ठकी म्हणाली. मग तिघी नाच करत गाऊ लागल्या,

*''गोरी गोरीपान फुलासारखी छान*
*आई मला एक बाहुली आण ।। धृ० ।।*
*गोऱ्या गोऱ्या बाहुलीचा लाल लाल फ्रॉक*
*लाल लाल फ्रॉकाचा काय बाई झोक*
*फ्रॉकावर मोर किती नाचतो छान!*
*आई मला एक बाहुली आण ।। १ ।।*

*गोऱ्या गोऱ्या बाहुलीचे निळे निळे डोळे*
*निळे निळे डोळे तिचे केस काळे काळे*
*केसांना रिबिनी शोभती छान!*
*आई मला एक बाहुली आण ।। २ ।।*
*गोऱ्या गोऱ्या बाहुलीचे लाल लाल ओठ*
*लाल लाल ओठ तिचे पुरीसारखे गाल*
*गालांवर खळ्या किती दिसती छान!*
*आई मला एक बाहुली आण ।। ३ ।।*

नाच मस्त रंगात आला होता. राणीचे आईबाबा लेकीला कौतुकाने पाहात होते. ते पाहून राणी लाजली, ''ए, तू का बघतेस ग आई?'' ती म्हणाली. आईने तिचा गालगुच्चा घेतला. मग सर्व मुलं आपापल्या घरी गेली. रात्री बाबा म्हणाले, ''हे बघ, मला एक युक्ती सुचलीय! टिल्लूने आपल्याला काहीही सांगितलं की आपणही मी नाही जा हा पाढा म्हणायचा. मग कळेल त्याला.'' आई बरं म्हणाली. ही गोष्ट राणीने सर्व मित्रमैत्रिणींना सांगितली.

टिल्लू रात्री जेवायला बसला. तो म्हणाला, ''आई पाणी दे.'' आई म्हणाली, 'तू घे ना जरा.'' ''दे ना ग.'' ''दे ना ग.'' ''मी नाही जा.'' आई म्हणाली. मग टिल्लूनेच पाणी घेतले. रात्री तो गणितं सोडवत बसला. त्याला एक गणित अडले. तो म्हणाला, ''बाबा हे गणित सांगा ना!'' बाबा म्हणाले, ''मला वेळ नाही. पुस्तकं वाचायचीत!'' ''सांगा ना हो! उद्या टीचर तपासणार आहेत.'' ''मी नाही जा.'' बाबा म्हणाले. तशी टिल्लू वैतागला. मग तो झोपायला गेला. राणीला तो म्हणाला, ''राणी, सापशिडी खेळायला येतेस?'' ''मी नाही जा.'' ती म्हणाली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी टिल्लू नेहमीप्रमाणे अंगणात क्रिकेट खेळायला गेला. राजू, विक्रम, गोटू, अमीत सारे जमले होते. टिल्लू म्हणाला, ''मी येऊ खेळायला ?'' ते मित्र गप्प बसले. ''चला ना खेळूया !'' टिल्लू म्हणाला. ''आम्ही नाही जा !'' मित्र ओरडले. टिल्लू रागाने घरी आला. आईला म्हणाला, ''मला सरबत दे आणून फ्रिजमधलं.'' आई म्हणाली, ''मी नाही जा.'' मग तो राणीकडे गेला. ती भातुकली खेळत होती. तो म्हणाला, ''येतेस माझ्याशी खेळायला !'' तशी राणी नि तिच्या मैत्रिणी म्हणाल्या, ''आम्ही नाही जा !'' टिल्लू रडकुंडीला आला. म्हणाला, ''सारे म्हणताहेत मी नाही जा, मी नाही जा !'' इतक्यात विक्रम आला. तो म्हणाला, ''राणी, वर्षा चला, आज आपल्याला अमीतकडे व्हिडिओवर कार्टून फिल्मस् बघायला बोलावलंय् !'' ते ऐकून टिल्लू खूष झाला. ''चल चल, मी येतो.'' तो आनंदाने म्हणाला. विक्रम गप्प बसला. मग म्हणाला, ''तुला नाही बोलावलंय् !'' ''का पण !'' टिल्लूने रागाने विचारले. ''कारण मी नाही जा चा पाढा म्हणणारा मुलगा नको आम्हाला.'' असं म्हणून तो निघून गेला. त्याच्यापाठून राणी नि तिच्या मैत्रिणीही गेल्या. इतक्यात टिल्लूचे बाबा आले. टिल्लू त्यांना म्हणाला, ''बाबा, आपण फिरायला जाऊ. नेता मला ?''

''हूं! मी नाही जा! चल ग, आपल्याला टिल्लूच्या आत्याने गप्पा मारायला बोलावलंय्! टिल्लूला नाही आमंत्रण !'' मग टिल्लूचे आईबाबा निघून गेले. टिल्लू एकटाच बसला कागदी फुलपाखराला घेऊन! तो फुलपाखराला म्हणाला, ''फक्त तूच खरा मित्र! सारे वाईट आहेत. बघ

कसे म्हणतात, ''मी नाही जा! मी नाही जा!'' रडता रडता टिल्लू पलंगावर पडून राहिला. तोच रंगीबेरंगी पंखांचं एक फुलपाखरूच तिथे आलं. म्हणालं, ''टिल्लू, तू रडू नकोस. पण तू कसा वागत होतास?'' ''कसा?'', टिल्लूने विचारलं. ''शेजारच्या काकूंनी नुसतं कुणाला निरोप द्यायचं साधं काम सांगितलं तरी तू मी नाही जा म्हणायचास! आईने काही सांगितलं की मी नाही जा! बाबांना, राणीला, विक्रमला, सगळ्यांना मी नाही जा सांगायचास! हो ना? म्हणून तुला ही शिक्षा मिळतेय. आता कळलं का असं वागल्याने कसं दुःख होतं ते!'' टिल्लू म्हणाला, ''खरंय तुझं! मी नुसता खादाड आहे, आळशी आहे. सारखं मी नाही जा हे गाणं म्हणतो. खरंच, यापुढे मी नीट वागेन. खरंच!'' टिल्लू म्हणाला. ''शाब्बास! टिल्लू, तू हुशार आहेस पण मेहनत करत नाहीस, तू धीट आहेस पण मदत करण्याची वृत्ती नाही, यामुळे तुझंच नुकसान होतं. परवा तुझ्या बाबांच्या मित्रांनी साधं तुला पेन आण म्हणून सांगितलं, त्यांनाही तू मी नाही जा म्हणालास. बाबांना किती वाईट वाटलं.'', फुलपाखरू म्हणालं. ''हो रे पाखरा! मी मूर्ख होतो, वाईट होतो. आई मला किती प्रेमाने खाऊ घालते, माझी कामं करते, राणी किती चांगली आहे, पण मी बाबांना, आईला, राणीला दुःख दिलं,'' बोलता बोलता टिल्लू रडायला लागला एकदम. ''शांत हो मुला! आता नीट वाग. अरे, आपल्या वागणुकीने आपण मित्र जोडायचे, घरातल्यांना सुखी करायचं, हो ना?'' फुलपाखरू कितीतरी वेळ बोलत होतं. ''हो, मी चांगला वागेन, खरंच,'' असं म्हणून टिल्लू फुलपाखराला हात लावायला उठला, तोच तो पलंगावरून

खाली पडला. त्याची आई, बाबा, राणी धावत आले. ''अं---फुलपाखरू कुठाय?'' टिल्लू डोळे चोळत म्हणाला. ''आई---बाबा---राणी--'' त्याने आश्चर्याने विचारलं, ''तुम्ही इतक्यात---'' ''हो रे.'' आई म्हणाली, ''तू झोपेत खाली पडलास.'' बाबा म्हणाले. ''मग फुलपाखरू कुठे?'' टिल्लूने विचारलं. ''ते स्वप्न असणार!'' आई म्हणाली. ''अग बाई, हे कागदी फुलपाखरू आहे.'' राणी म्हणाली. टिल्लूला सगळं आठवलं. आपली चूक कळली. तो म्हणाला, ''आई, बाबा, मी चुकलो. राणी, आजपासून मी नाही जा हा पाढा बंद!'' ''खरंच? राजा, अरे आम्ही उगीच बाहेर फिरून आलो. राणीसुद्धा कुठे नाही गेली. तुला सोडून आम्ही कधी मजा करतो? तुला धडा शिकवायला आम्ही नि तुझ्या मित्रांनी नाटक केलं. वेड्या, तू चांगला वागावास म्हणून आम्हाला खोटं खोटं मी नाही जा म्हणावं लागलं. चल, गरम गरम जेवूया. तुझ्या आवडीचे गुलाबजाम केलेत.'' त्याला जवळ घेत आई म्हणाली. तोच विक्रम, वर्षा, गोटू सारे आले. ते हसत होते. राजू म्हणाला, ''अमीत, चॉकलेट दे ना टिल्लूला, राणीला.'' ''अरे, पण तुम्ही कार्टून...'' टिल्लू म्हणाला, ''मित्रा, तुला सोडून काही मजा करतो का आम्ही? तुझ्या आईने तुला धडा शिकवायला आम्हाला मुद्दामच तसं वागायला सांगितलं होतं. परवा संध्याकाळी जमू सारे! काय?'' ''ओ! किती मज्जा!'' गोटू म्हणाला. अमीतने टिल्लूला मिठी मारली. सारे आनंदाने नाचायला लागले. टिल्लूच्या आईबाबांच्या डोळ्यात पाणी तरळले.

* * *

# चुकलं गं माझं !

शनिवार असल्यामुळे मिनी दुपारी घरीच होती. जेवणी-खाणी आटोपल्यावर मिनीची आई जरा डुलकी काढायला पलंगावर लवंडली. मिनीने मग आपला मोर्चा खाली अंगणात वळवला. बागेतल्या नळावर भीमाबाई भांडी घाशीत होती. तिने नळ अर्धवट उघडून ठेवला होता. मिनी तिच्याजवळ उभी राहून तिची हालचाल पाहात राहिली. ''काय गे बाय, निजली नाय ?'' भीमाबाईने भांडी घासता घासता विचारलं. चिंच लावून चकचकीत झालेली भांडी पाहात मिनी उद्गारली, ''नाही - मी काय म्हातारी आहे होय झोपा काढायला ?'' भीमाबाई ते ऐकून मजेत हसली. इतक्यात एक कावळा नळाच्या दांडीवर येऊन बसला. नळातून गळणारं पाणी चोचीने पिऊ लागला. मिनीला त्या कावळ्याच्या हुशारीचं मोठं कौतुक वाटलं.


VAZE

भीमाबाई भांडी धुण्यासाठी नळाजवळ गेली तोच तो कावळा जरा दूर उडाला, मग पुन्हा आला. त्याचं ते लबाडीचं वागणं पाहून मिनीने मातीचं ढेकूळ उचलून त्याच्या दिशेने भिरकावलं. कावळा नेम चुकवून उडाला आणि माती स्वच्छ भांड्यांवर पडली. श्रमाने दमलेली भीमाबाई ओरडत म्हणाली, ''हे काय केलंसा मिनीबाय? आँ? दम धर, तुज्या आयशीलाच सांगते.'' असं पुटपुटत ती बिचारी भांडी उचलून बंगल्याच्या जिन्याकडे वळली. मिनीने लांब जीभ काढून तिला नुसतं वेडावून दाखवलं आणि ती पाठच्या बाजूला पळाली. पेरू आणि जांबाची पानाफळांनी डवरलेली दोन झाडं ही तिथे मिनीसाठी मोठ्ठी आकर्षणं होती. पेरूच्या झाडावर पोपटराव येऊन आरामात पेरू खात होते. मिनी त्याला पाहून खुदकन् हसली. म्हणाली, ''वा रे वा! बेटा स्वत:चं झाड असल्यासारखा बसलाय ऐटीत!'' पोपटाने तिच्याकडे तिरक्या नजरेने नुसतं पाहिलं नि तो पुन्हा पेरू खाऊ लागला. पेरू चांगला लालबुंद होता. मिनी तिच्या वेण्यांच्या लाल रिबिनींशी चाळा करत झाडाच्या एका जाडजूड फांदीवर अलगद बसली. हळूच तिने एक दगड उचलला आणि त्या पोपटाला मारला. अर्धवट खाल्लेला पेरू टाकून पोपट जीव घेऊन उडाला. भीमाबाईच्या बोलण्याने जागी झालेली आई खिडकीतून मिनीच्या खोड्या पाहातच होती. ''मिने, वर ये! राजूला जरा खेळव.'' आई ओरडली. राजू - पाचसहा वर्षांचा तिचा भाऊ - मात्र मिनीचा एकदम लाडका! ती लगेच एक पायरी सोडून एक अशा भराभर पायऱ्या चढत वर पळाली. राजू उठून एका ताटलीत तंबीटाचा लाडू खात होता. मिनीने त्याचा गालगुच्चा घेतला. म्हणाली, ''वा! एकटा

एकटा खातोस ? ताईला नाही देणार ?'' राजू हाडाचा गरीब असल्यामुळे त्यानं अख्खा लाडू तिच्या तोंडात कोंबला. ''नाही रे राजू, गंमत केली.'' असं म्हणत मिनीने त्याचा लाडू त्याला परत दिला. इतक्यात आई ओरडली, ''मिने, इथे ये!'' ''काय ग आई?'' स्वैंपाकघरात आईजवळ जात मिनीने विचारलं. आईच्या पदराशी चाळा करत ती आई पातेल्यात काय बनवतेय हे पाहात राहिली. ''वा! गूळपोहे!'' जिभल्या चाटत मिनी उद्गारली. ''भीमाबाईच्या भांड्यात माती का फेकलीस?'' आईनं रागानं विचारलं. ''कावळ्याला हाकलवत होते. कावळा उडाला. खाली भांडी होती, मग? भांड्यातच पडणार ना? पोहे दे! पोहे दे आधी!'' मिनी वाटीचमचा घेत म्हणाली. आईने पोहे नीट ढवळून वाफ येण्यासाठी गॅस मंद केला, पातेल्यावर ताटली ठेवली आणि ताटलीत थोडं पाणी ठेवलं. मग पदराने कपाळावरचा घाम पुशीत ती म्हणाली, ''मिने, काही का असेना, चूक झाली ना तुझी?'' आईच्या हातातल्या हिरव्यागार काचेच्या बांगड्या हाताने पुढे मागे करत मिनी म्हणाली, ''कशी काय? मुद्दाम थोडंच केलं मी?'' ''कबूल! पण चुकून झालं ना तुझ्या हातून? भीमाबाईला 'चुकलं माझं' एवढं जरी म्हटलं असतंस ना तरी बरं वाटलं असतं.'' तिच्या वाटीत पोहे वाढत आई म्हणाली. मिनीने तब्येतीने पोहे खायला सुरुवात केली. फू फू करून ती फुंकरीने ते पोहे थंड करत होती. ''अग, जरा दम धर! पोहे कुठे पळून चाललेत का?'' आई हसून म्हणाली. आपल्या गोऱ्यापान, सुरेख, हुशार पोरीकडे ती कौतुकाने पाहात राहिली. पण या बारा वर्षांच्या पोरीला अक्कल कधी येणार या

काळजीने ती जराशी गोंधळात पडायची. आतासुद्धा मिनीने छान भरतकाम केलेला फ्रॉक मातीत मळवून ठेवला होता. केसांच्या रिबिनी सुटल्या होत्या. 'नुसता द्वाडपणा भरलाय हिच्या अंगात! दुसरं काय!' असं म्हणत आईने राजूला एका वाटीत पोहे नेऊन दिले आणि ती त्याला खिडकीशी बसवून गोष्ट सांगायला लागली. मिनीने चांगले दोन-तीन वाट्या पोहे संपवले. वर घटाघटा पाणी प्याली आणि खाली अंगणात पळाली.

अंगणात चिमी, कमी, वच्छी अशा तिच्या मैत्रिणी लगोरीच्या दगडांची मांडणी करत होत्या. ''ए, मी ठेवते एकावर एक!'' असं म्हणत मिनी पुढे सरसावली. मग लगोऱ्यांचा डाव सुरू झाला. मिनीने अगदी मनसोक्त खेळून घेतलं. अगदी दमायला झालं तेव्हा कवठीचाफ्याच्या रोपापाशी ती फतकल मारून बसली. मग तिच्या मैत्रिणीही तिच्यापाशी येऊन बसल्या. सूर्य मावळला होता. त्याचा लालसर प्रकाश सर्वत्र पसरला होता. कवठीचाफा, मोगरा या झाडांवरील फुललेली फुलं आपल्या सुगंधाने आसमंताला मोहीत करत होती. मिनी आभाळाकडे पाहात म्हणाली, ''चिमी, ढग खरंच चालतात का ग?'' ''काय की बाई! चालत असतीलही! का ग?'' चिमीने विचारलं. ''का काय! अग, ते म्हणे पकडापकडीसुद्धा खेळतात. म्हणून त्यांचा आवाज येतो म्हणे! वाचलं होतं मी कुठेसं!'' मग त्यांच्या ढगांबद्दल गोष्टी सुरू झाल्या. इतक्यात वच्छीने विचारलं, ''मिने, माझी वही देतेस मराठीची?'' ''हो! चल! झालं माझं लिहून!'' असं म्हणत हात झटकत मिनी उठली आणि जिन्याकडे जाऊ लागली. तिच्यापाठून तिच्या

मैत्रिणीही गेल्या. घरात आल्यावर मिनीने दप्तरातून वच्छीची वही काढली. तिचं वरचं पान फाटलं होतं. ''अय्या! हे कसं फाटलं?'' वच्छीने विचारलं. ''कसं म्हणजे! आपोआप! ओढून काढताना फाटलं! त्यात काय एवढं?'' मिनीने म्हटलं. मुलींना दाणे द्यायला आलेल्या आईने ते ऐकलं. ''मिने, तिची वही फाडलीस?'' ''नाही - सगळ्या पुस्तकांतून काढताना फाटली.'' मिनी दाणे खात उत्तरली. आई रागाने आत निघून गेली. इतक्यात विमानाचा आवाज आला. खिडकीपाशी धावत जात मिनी म्हणाली, ''ए, बघा तरी! बघा तरी!'' पण धावताना तिचा हात कमीच्या डोळ्याला लागला. कमी रडायला लागली. तिच्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं. थोड्या वेळाने मिनीचं तिच्याकडे लक्ष गेलं. पण तिने त्या गोष्टीला विशेष महत्त्व दिलंच नाही. चिमीनेच मग आपल्या रुमालाने तिचा डोळा पुसला. तोंडात रुमाल धरून तो वाफेने गरम करून तिच्या डोळ्यावर धरला. तिघीजणी घरी निघून गेल्या. ''काय ग, कमी रडली?'' आईने त्यांना घरी जाताना पाहून विचारलं, ''भांडलात?'' ''अहं! माझा हात लागला तिच्या डोळ्याला! नखरे नुसते कमीचे! गेली उडत!'' असं म्हणून मिनी राजूकडे पळाली.

रात्री जेवणं झाल्यावर मिनी तिच्या बाबांजवळ गप्पा करत बसली. तिच्या बाबांजवळ परी, चेटकीण, राक्षस, बागुलबुवा, संकासुर यांच्या मजेशीर गप्पांचा खजिना होता. परी गोरी गोरी दिसते. कारण ती दुधाने आंघोळ करते; आणि चेटकीण दुष्ट असते कारण ती मुलांना बेडूक, किडा असं काहीतरी बनवते असं तिचे बाबा तिला रंगवून रंगवून सांगू लागले. त्या परीच्या, राक्षसाच्या राज्यात फिरायला मिनीला

गंमत वाटायची. ''चला, झोपा आता मिनूताई!'' गोष्टी संपवत बाबा म्हणाले. ''बाबा, आता एकच बरं का!'' मिनी लाडीगोडी लावत म्हणाली. ''बरं बरं! मला आधी पाणी आण बघू!'' बाबांनी तिला विनंती केली. मिनी पाणी घेऊन आली. तो पेला ती बाबांच्या हातात देणार तोच तो तिच्या हातून निसटला. आणि पेल्यातलं पाणी गादीवर सांडलं. ''अग अग, काय हे मिने?'' बाबा गादीवरची चादर काढत म्हणाले. तिची आईही तिच्यावर रागावली. ''अग, काळजीपूर्वक कामं करावीत.'' बाबा म्हणाले. ''मी नीटच चालत होते. पण चादरीला अडखळले म्हणून सांडलं.'' मिनी उत्तरली. ''अग, पण चूक तुझीच ना?'' आईने विचारलं. ''नाही.'' मिनी फुरंगटून म्हणाली आणि निजायला गेली.

दुसऱ्या दिवशी रविवार असल्यामुळे मिनी सकाळीच अंगणात फुलं वेचायला गेली. समोरच वच्छी, कमी, चिमी ठिकरीने खेळत होत्या. ''अय्या, मला नाही बोलावलंत?'' हातातली परडी मेंदीच्या कुंपणालगत ठेवत मिनीने विचारलं. पण कुणी काही बोललंच नाही तिच्याशी. मग ''मी येते ना!'' असं म्हणत ती त्यांच्यात खेळायला धावली तशी त्या तिघींनी खेळ बंद केला. ''तू नको येऊस.'' वच्छी म्हणाली. ''का?'' मिनीने विचारलं. ''असंच कंटाळा आला.'' चिमी म्हणाली. त्या तिघी ढिम्म बसून राहिल्या. मग वैतागून मिनी घरी आली. तिच्या आईने नुकतीच केसांवरून आंघोळ केली होती. ओले केस पुसता पुसता तिने म्हटलं, ''अनंताची फुलं मिळाली? वा! काय गोड वास आहे नाही?'' पण मिनी काहीच बोलली नाही. नुसतीच

आईला पाहात राहिली. गोरी गोरी, लांब केसांची, कपाळाला छान कुंकू रेखलेली, केसांना दवण्यामरव्याचा सुगंध असलेली तिची आई तिला खूप आवडायची. पण या वेळी, मैत्रिणींनी अपमान केलेल्या वेळी, तिला कुणाकुणाशी बोलावंसं वाटेना. ''काय ग? बरं नाही? काटा रुतला?'' तिला जवळ घेत आईने विचारलं. ''नको येऊ दे खेळायला माझ्याशी कुणीसुद्धा! मी पुस्तकं वाचेन! अडलंय माझं!'' असं म्हणत तिने पुस्तकांचं कपाट उघडलं. पण गळ्याशी दाटलेला हुंदका आवरेना तिला. ''काय झालं? भांडण?'' आईने तिला थोपटत विचारलं. ''हूं! चिमी, वच्छी कमी, वाईट आहेत. म्हणे माझ्याशी खेळणार नाहीत! का? वच्छीची वही काय मी मुद्दाम फाडली? कमीच्या डोळ्याला काय मुद्दाम हात मारला? गेल्या उडत! ही पुस्तकंच आता माझ्या मैत्रिणी!'' मिनी रागारागाने बोलत होती. आता तिच्या आईला सारा उलगडा झाला. गोड स्वरात ती म्हणाली, ''मिनी, मुद्दाम नाही तरी चुकून झालंच ना? नुसतं म्हण त्यांना, 'चुकलं ग माझं!' आणि बघ जादू! चूक कबूल केलीस तर कुठे बिघडतं? उलट मैत्री जास्त बळकट होते. चूक कबूल करण्यानं तुला कमीपणा थोडाच येणार? उलट मन शांत होईल बघ! अग ही पुस्तकं ज्ञान देतात, पण कितीही झालं तरी ती निर्जीव! तुझ्या मैत्रिणी म्हणजेच एकेक चालतंबोलतं पुस्तक आहे. काल भीमाबाईला, बाबांना आणि मैत्रिणींना 'चुकलं ग माझं!' एवढेच शब्द हवे होते. वेडे, असं म्हणावं लागतं. माणसांत राहायचं ना मिळून मिसळून? मग? ऊठ, पळ. मैत्रिणींना म्हणावं, 'चुकलं माझं' आणि बघ.'' मिनी आईचं बोलणं ऐकत होती. खरं

तर तिलाही तसंच वाटत होतं. चूक कबूल करण्यात कमीपणा नाही हे आईचं म्हणणं तिला पटलं. आईसुद्धा तशीच तर वागते! परवा आमटीत मीठ दोनदा पडलं तर बाबा किती चिडले. आई आपली हसून म्हणाली, ''चुकलं माझं!'' आणि मग बाबाही शांत झाले. मग आपणच का नाही चूक कबूल करत? मिनी विचार करत बसली. आई स्वैंपाक करायला निघून गेली. मिनी खिडकीतून खाली पाहात होती. चिमी, वच्छी आणि कमी मस्तपैकी खेळत होत्या. हसत होत्या. तडक उठून मिनी त्यांच्याजवळ गेली. म्हणाली, ''कमे, चुकलं माझं. वच्छी... खरंच माझं चुकलं ग! तुझी वही...'' ''अग त्यात काय? ये, खेळू या आपण!'' तिला पुढे बोलू न देता त्यांनी तिला जवळ ओढून खेळायला घेतलं. त्या चौघींचं ते सुंदर बालपण मिनीची आई खिडकीतून डोळे भरून पाहात राहिली.

* * *

# सोनाराने कान टोचले !

म. ग्रं. सं. ठाणे वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. 2573 दिनांक
विषय

मिनी शाळेतून घरी आली ती अगदी खुषीतच ! ''वा ! प्रगतीपुस्तक मिळालेलं दिसतंय ! पहिला नंबर का ?'' आईने तिचं दप्तर घेत म्हटलं. ''अंहं ! लायब्ररीतून पुस्तकं मिळाली आज ! मला कवितांचं छाऽऽन पुस्तक मिळालं आहे.'' मिनी टेबलाजवळ बसत म्हणाली. ''हातपाय धू नि मगच खा.'' आई ओरडली. पुस्तक कधी एकदा वाचेन असं तिला झालं होतं. म्हणून मग तिने लगबगीने हातपाय धुतले, खाणंपिणं आटोपलं आणि मग तिची स्वारी कवितांचं रंगीत मुखपृष्ठ असलेलं पुस्तक घेऊन खिडकीशी जाऊन बसली.

पुस्तकावर माकडाचं सुंदर चित्र होतं. माकडवाल्याचंही रंगीत चित्र काढलेलं होतं. माकड दोन हातांत काठी धरून, ती खांद्यावर ठेवून कंबरेत वाकून चालताना पाहून मिनी खुदूखुदू

हसायलाच लागली. माकडवाल्याच्या हातात डमरू होता. मिनीने पुस्तक उघडलं. पुस्तकाची पानं गुळगुळीत होती. मिनीने हळुवारपणे पुस्तकाच्या पानांवरून हात फिरवला. मग ती कविता वाचू लागली; 'ओळखा पाहू'

*अटक मटक चवळी चटक*
*चवळी लागली गोड गोड*
*मुलं मुली कोडी घाली*
*त्यांचं उत्तर सांगेल कोण ?*

मिनीला कवितेची सुरुवात आवडली. ती उत्सुकतेने पुढे वाचू लागली,

*पतंगाला उडविते, फुग्यामध्ये लपते,*
*बासरीच्या पोटातून गोड गाणी गाते,*
*पानाफुला डोलवी ही नाही दिसे डोळा,*
*कोण बोला !*

मिनी विचारात पडली. कोण बरं ही जादुगारीण ? अं... ? हं ! ही तर हवा ! मग तिने उत्तर पाहिलं. ते बरोबर आहेसं पाहून तिला किती मज्जा वाटली. मिनी पुढची कोडी, कविता वाचण्यात नुसती दंग झाली. माकडाची कविता तर फारच गमतीची होती. लाल चड्डी आणि लाल शर्ट घातलेलं माकड कोलांट्या उड्या कसं मारतं, टोपी कसं उडवतं, नाक कसं खाजवतं वगैरे सारं वर्णन वाचताना मिनीला किती वाजले ते कळलंच नाही. तिची आई तिच्या खोलीतला दिवा लावत म्हणाली, ''मिने, काय हे ? बाहेर काका आलेत तुझे ! चल ऊठ.''

मिनी कुरकुरतच उठली. तिने युनिफॉर्म बदलला नव्हता म्हणून तिची आई तिला ओरडली. शाळेतून आल्यावर मिनीने

तोंड धुतलं नव्हतं की केसही विंचरले नव्हते. ''काय हा अवतार मिनी!'' आई ओरडतच होती. मिनीने तिच्याकडे लक्षच दिले नाही. ती धावत काकांजवळ गेली. ''काका, काका,'' मिनीने लडिवाळपणे म्हटलं.

''ये बाळ. हा घे तुला खाऊ.'' असं म्हणत काकांनी तिला खाऊची पुडी दिली. मिनीने हात पुढे केला तो काय! हात चिकट होता. मळलेला होता. संध्याकाळी खाणं खाल्ल्यावर तिने तो धुतलाच नव्हता. ''अग, तुझा हात बघ किती अस्वच्छ आहे!'' काका म्हणाले. मिनी हात धुवायला गेली तशी त्यांनी खाऊ तिच्या दादाला दिला. दादाने मिनीला चिडवत खाऊ खायला सुरुवात केली. मिनी रुसून कोपऱ्यात जाऊन बसली. काका गेल्यावर आई म्हणाली, ''मिने, रोज संध्याकाळी तोंड धू. कपडे बदल. केस विंचर, कळलं? किती वेळा तेच तेच सांगायचं?''

''पण दादाने माझा खाऊ आधी का खाल्ला?'' मिनीने गाल फुगवत विचारलं.

''तुझ्या गबाळेपणामुळे! कळलं?'' असं म्हणून आई स्वैंपाकघरात निघून गेली. मिनीने दादाला नि आईला जीभ काढून वेडावलं नि ती पुन्हा कवितांचं पुस्तक उघडून वाचत बसली. रात्रीची जेवणं आटोपली. मिनीला जेवल्यानंतर लगेच झोप आली. वाचता वाचताच ती झोपी गेली. तिला तिच्या गादीवर ठेवता ठेवता आई वैतागून म्हणाली, ''अरे देवा! हिने अजूनही युनिफॉर्म बदलला नाही! अगदी अव्यवस्थित मुलगी आहे. आणि या पुस्तकाची काय ही दशा! तेलाचे डाग पाडलेत वाटतं!'' आईने मग पुस्तक मिटून तिच्या दप्तरात ठेवलं. दुसरे दिवशी शनिवार असल्याने सकाळची

शाळा होती. त्यादिवशी मिनीच्या शाळेत पाहुणे येणार होते. मिनी म्हणाली, ''ए आई, मला दुसरा युनिफॉर्म दे ना!''

''अग दुसरा युनिफॉर्म इस्त्रीवाल्याकडे दिला आहे आणि एक मी धुतला आहे. अजून ओलाच आहे तो! काल तू युनिफॉर्म का बदलला नाहीस?'' आईने विचारलं.

''अग पण पुस्तक वाचायला मला मजा वाटत होती ना? बरं, इस्त्रीवाल्याकडून आणू मी?'' मिनीने ऐटीत विचारलं.

''इतक्या सकाळी साडेसहाला इस्त्रीवाल्याचं दुकान उघडं नसतं. तू आता हाच युनिफॉर्म घालून जा. उशीर होईल.'' आई घाईघाईने म्हणाली आणि तिचा डबा भरायला स्वैंपाकघरात गेली.

मिनी शाळेत पोहोचली तेव्हा सर्व मैत्रिणी तिच्याभोवती जमल्या. आज तिसरीच्या मुलांना कविता ऐकवायला, प्रश्न विचारायला कुणी पाहुणे येणार होते. मिनी पहिल्या नंबराची मुलगी असल्यामुळे इतर मैत्रिणी तिला ही माहिती द्यायला पुढे पुढे करत होत्या. शाळा भरली. बाई वर्गात आल्या. त्यांनी हजेरी घेतली. मग म्हटलं, ''आज आपल्या वर्गात लहान मुलांसाठी कविता लिहिणारे दिलीपमामा येणार बरं का! मिने, इकडे ये. तू कविता म्हणशील?''

मिनी आनंदाने उठून बाईंजवळ गेलीबाईंनी मिनीचा युनिफॉर्म पाहिला. तो चुरगळलेला, मळलेला होता. केसांच्या रिबिनी सुटलेल्या होत्या. तिचा तो अवतार पाहून बाई म्हणाल्या, ''मिने, तू कविता छान म्हणतेस. पण तू गबाळी आहेस. पाहुण्यांसमोर तुला मी कशी बोलवू? त्यापेक्षा गौरीलाच मी कविता म्हणायला सांगते. बघ, ती कशी नीटनेटकी आणि स्वच्छ आहे.''

मिनी हिरमुसली. तिने एक सुंदर कविता आठवून ठेवली होती. परंतु पाहुणे आल्यावर गौरीने कविता म्हटली,

*मजेदार हा वारा पळतो*
*मजेदार ओढाही वाहतो*
*मजेदार झाडेही नाचती*
*पक्षीही गाती, गड्यांनो, पक्षीही गाती!*
*पतंग उडती गगनामध्ये*
*ढगाआड ग लपती छपती*
*गंमत जंमत येते भारी*
*फुले अहा हासती*
*गड्यांनो, फुले अहा हासती!*

गौरीची कविता संपली आणि पाहुण्यांनी टाळ्या वाजवून तिचे कौतुक केले. ते म्हणाले, ''वा! छान! हे घे तुला बक्षीस!'' गौरीला एक कवितांचं पुस्तक त्यांनी भेट दिलं. त्यांनी लिहिलेल्या कवितांचं! मिनी ते पाहून अगदी नाराज झाली. गौरीपेक्षा तिने सुंदर कवितावाचन केलं असतं. पण तिच्या गबाळेपणामुळे तिला पाहुण्यांपुढे जाता आलं नाही. मिनी शाळा सुटल्यावर घरी गेली. आधी तिने हातपाय तोंड धुतले! मग तिने कपडे बदलले. केस सारखे केले. तिच्या आईला आश्चर्यच वाटलं. हळूहळू तिला सर्व कथा समजली. मिनीचा गालगुच्चा घेत आई म्हणाली, ''सोनारानेच कान टोचले की बरं असतं!''

* * *

# खोक्यातले बक्षीस

एक होती छोटी मुलगी. तिसरीत असेल पण भारी तरतरीत. हुशार! वाचनाचं किती वेड तिला! पुन्हा वाचलेलं सगळं लक्षात ठेवायची. मिनी तिचं नाव. अभ्यास तर जीव ओतून करायची. बालकवींच्या कविता तिला आवडायच्या. तिची आई तिला त्या गाऊन दाखवायची. मिनी जराशी बडबडी होती. पण तरी सगळ्यांना आवडायची. तिची मैत्रीण चिमी कधीकधी तिच्यावर रागवायची. कारण मिनी तिला चिंचा, आवळे टुक टुक करत चिडवून खायची. नंतर द्यायची पण जरा चिमीला चिडवूनच! मिनीला एक भारी वाईट खोड होती. ती म्हणजे नखं खाण्यांची! सारखी रिकामी असताना नखं खायची. चावून चावून मटकावायची. आई म्हणायची, ''मिने, आज



भाजी कमी आहे बरं का! नख लाव तोंडीला!'' तरी तिला लाज नाही की लज्जा नाही! दाणे खावे तशी नखं खायची. त्यामुळे नखं मांसात रुतून बसली होती. कधीकधी रक्तही यायचं त्या भागातून! पण मिनीने ही सवय कधी सोडली नाही. एकदा तिची आई करंज्या करत होती. लाटीमध्ये सारण भरून तिच्या आईने लाटी दुमडली नि ती ते चिरण्याने बाजूने कापून करंजीचा आकार करणार तोच मिनी म्हणाली, ''ए आई ग, मी करू असं अर्धवर्तुळाकार कापायचं काम?'' ''शी! नखं खाऊन हात उष्टे करतेय सदैव! ऊठ!'' आई ओरडली. मिनीच्या गोऱ्या गुलाबी गोबऱ्या गोबऱ्या गालांवरून अश्रू ओघळले. ''लगेच रडू बरं आलं! एवढं वाटतं तर बंद कर ती दरिद्री सवय!'' आई चिडून म्हणाली. मग मिनी कोपऱ्यात तोंड करून नखं खात बसली. आधी करंगळी, मग मरंगळी, मग मधलं बोट असं करत अंगठ्यापर्यंत सगळ्या बोटांवर स्वारी करून तिने नखं फस्त केली. तिच्या बाबांनी, आजीने, मैत्रिणींनी किती किती समजावलं तिला की, 'मिने, नखं नको खाऊस. त्यामुळे दात पुढे येतात. पोटात नखातील घाण जाते. रोग होतील काहीतरी. शिवाय नखं दिसतात किती घाणेरडी! कुरतडलेली. शी! सोड ग बाई ही सवय! दिसायलाही एकदम किळसवाणी!' पण मिनी शांतपणे नखं खात हे सारं ऐकायची. आजी म्हणायची, ''पालथ्या घड्यावर पाणी हिला सांगायचं म्हणजे! रूप नक्षत्रासारखं, अक्कल विद्वान माणसासारखी पण ही दुष्ट सवय आहे ना सगळ्याला गालबोट लावायला!'' तरीही मिनीचा नखं खाण्याचा कारखाना चालूच!

एकदा आला मिनीचा वाढदिवस. आईने केल्या शेवया. नारळाचा रस काढला त्यात बुडवून खायला! लाडू केले, पुऱ्या केल्या. भाजी केली नि सर्वांना खायला दिलं. मिनीला औक्षण केलं. ती सर्व वडील मंडळींच्या पाया पडली. रांगोळी घातलेल्या त्या पंगतीला उदबत्त्यांनी कशी शोभा आली. मग एकेका मैत्रिणीने, काकाने, मामाने, आईने, मिनीला वाढदिवसाची भेट म्हणून एक खोके दिले छोटेसे! सुंदर वेष्टनात गुंडाळलेले! जेवल्यावर मिनीने त्या प्रत्येक खोक्याभोवती गुंडाळलेली रंगीत रिबिन सोडून पाहिलं. तो काय, त्यात प्लास्टिकची नखं! रंगीत! छोटी-मोठी! लांब-रुंद! सगळ्या सगळ्या खोक्यात नखंच नखं! ''हे काय!'' पाय आपटत खोके फेकत मिनी म्हणाली. ''तू नखं का खातेस?'' चिमीने विचारलं. ''मला ती आवडतात म्हणून! कळलं?'' मिनीने चिडून म्हटलं. ''हो ना? मग? तुला सर्वात नखं अतिशय आवडतात. इतकी की, ती न फेकता तू खाऊन टाकतेस. हो ना? मग तुला आवडणारी गोष्टच आम्ही सर्वांनी ठरवून तुला भेट दिली तर का रागावलीस?'' आईने विचारलं. आता मिनी चूप बसली. तिला आपली चूक कळली. हळूहळू तिने नखं खाण्याची सवय बंद केली. करणारच! नाही तर पुढल्या वर्षीही वाढदिवसाला तिला नखंच मिळणार भेटवस्तू म्हणून!

* * *

# टी.व्ही. वर राजू

“ए राजू, अरे आज संध्याकाळी आपली नाटकाची तालीम आहे, लक्षात आहे ना ?'' पल्लवीने विचारलं. ७-८ वर्षांचा राजू मोठ्या तोऱ्यात म्हणाला, ‘‘हो! हो! आहे तर! टी.व्ही. वरच्या लहान मुलांच्या कार्यक्रमासाठी तर हे नाटक निवडलंय्! मीं बरा तालमीचा दिवस विसरेन ?'' राजू उड्या मारत म्हणाला. छोटी तनुजा, मनू, प्राची, अनू साऱ्याजणी नाटकात कामं करणार होत्या. राजू आणि त्याचा दोस्त बबन यांनाही त्या नाटकात गमतीच्या भूमिका होत्या. गेले आठ दिवस जान्हवीमावशींकडे मुलं नाटकाच्या तालमीला जात होती. अभ्यास, शाळा सांभाळून मुलं नाटक उभं करत होती. पाच वर्षांची तनुजा भारी गोड होती. नाच तर कित्ती छान करायची. सगळं कसं मजेत चाललं होतं. पण आजच्या

संध्याकाळी जान्हवीमावशीला वाटलं की राजूला नाटकातून काढून टाकावं. त्याच्याऐवजी आपला कुणीतरी नातलग आणावा. राजू जरासा खोडकर होता, पण नाटकात काम चांगलं करायचा. आपल्याला उगीचच काढून टाकणार म्हणून तो चिडला. पण छे! जान्हवीमावशीने तिच्या पुतण्यालाच घेतलं. राजूला म्हटलं, ''अरे, तुला किनई हे इतकं नीट जमत नाही. तुला पुढच्या वेळी घेऊ हं.'' राजूने आपले गोबरे गाल आणखीनच फुगवले. त्याला अगदी रडू येत होतं. पण त्याने कसंबसं रडू आवरलं. पल्लवी, अनू, तनू साऱ्या त्याच्याकडे बघत बसल्या. राजूला तिथे बसवेना. तो तडक घरी आला. बबन त्याला गोळी देत होता ती सुद्धा त्याने घेतली नाही.

रस्त्यात त्याला फुगेवाला दिसला. माकडवाला दिसला. माकडीणबाई काठी टेकीत टेकीत चालत होत्या. पण राजूला आज काहीच बघावेसे वाटत नव्हते. बागेतून जाताना त्याला कितीतरी चतुर दिसले. पण चतुरांचं गुणगुणणं त्याला ऐकावंसं वाटेना. तो घरी आला तेव्हा त्याची आई त्याच्या छोट्या बहिणीला दूधभात भरवीत होती. बेबी मजेत जेवत होती. राजूला पाहताच ती ओरडली, ''दादा..'' पण नेहमीसारखं राजूने तिला जवळ घेतलं नाही. तिचे लाड केले नाहीत. राजूचं तोंड बघून आई म्हणाली, ''अरे, बरं नाही का? सोन्या, आज गप्प गप्प का?'' ''काही नाही'' राजू तोंड वाकडं करत म्हणाला. मग आईने बेबीला बाजूला ठेवलं. तिचं तोंड धुतलं, आपले हात धुतले नि राजूला जवळ घेत म्हटलं, ''बोल.'' राजू रडे आवरत जोरात ओरडला,

''मला काढून टाकलं जान्हवीमावशीने!'' आणि मग आईच्या कुशीत शिरून तो रडायला लागला. आईला

त्याच्यावरचा अन्याय जाणवला. पण ती तरी काय करणार होती? रडणाऱ्या राजूला शांत करीत ती म्हणाली, ''वेड्या, जान्हवीमावशीने तिच्या नाटकातून तुला काढलं, पण तू स्वत:च्या हिंमतीवर टी.व्ही.च्या पडद्यावर का नाही झळकत?'' ''म्हणजे?'' राजूने विचारलं. ''बाळ, शिवाजी कुणाला सांगायला नव्हता गेला माझ्यावर पोवाडे रचा म्हणून! आपलं स्मारक उभारा म्हणून शिरीषकुमारनं नव्हतं सांगितलं कुणाला! झाशीच्या राणीवर साहित्यिकांनी नाटक लिहिलं, कादंबऱ्या लिहिल्या, का बरं? कारण ही सर्व माणसं आपल्या पराक्रमाने जगाला दिपवून गेली. राजू, रडू नकोस. उलट जान्हवीमावशीने तुला धडा शिकवला.'' राजू आईचं बोलणं ऐकत होता. पण त्याला काहीच कळत नव्हतं. ''तो कसा काय?'' त्याने आता रुबाबात विचारलं. ''ऐक. या प्रसंगावरून तू जिद्द धर, हिंमत बाळग. तुझ्या बोटांत जादू आहे.''

''म्हणजे ग काय?'' राजूने आश्चर्याने विचारलं. ''म्हणजे तू सुंदर चित्र काढतोस, रंगवतोस. शंकर्स वीकलीच्या चित्रकलास्पर्धेसाठी आत्तापासून सराव कर. तू नुसत्या उनाडक्या करतोस, ते थोडं कमी कर नि चित्रकलेचा अभ्यास वाढव. कळलं का राजूदादा?'' आईने त्याचा लाडाने गालगुच्चा घेतला. राजूच्या मनात स्पर्धेची ठिणगी पेटली. तो नियमितपणे चित्रं काढून रंगवू लागला. भारतातल्या परिस्थितीचे वर्णन करणारे चित्र काढण्याचा विषय त्याला होता. एका बाजूला पानांत टाकलेलं अन्न असं श्रीमंत जेवणावळीचं चित्र तर दुसऱ्या बाजूला भुकेने तडफडणारा एक कोवळा मुलगा असं परस्परविरोधी चित्रण

राजूने केलं होतं. त्या मुलाच्या तोंडावरचा भुकेचा भाव नि श्रीमंत शेठजीच्या तोंडावरचा मातल्याचा भाव फार सुरेख रंगवला होता.

राजू निकालाची वाट पाहात होता. गेले ७-८ महिने तो प्रयत्न करत होता, श्रम करत होता. आता काही महिन्यांनी त्याला त्याच्या कलेचं स्थान कळणार होतं. बघता बघता दिवस गेले. महिने लोटले. आणि एका सोनेरी क्षणी राजूने पेपरात आपला निकाल वाचला. राजूला सोन्याचं पदक मिळालं होतं. त्याचं चित्र उत्कृष्ट ठरलं होतं. पेपरात आपलं नाव वाचता वाचता त्याच्या नि त्याच्या आईच्या डोळ्यांत पाणी आलं. आणि एके दिवशी 'किलबिल' या दूरदर्शनच्या कार्यक्रमात राजूला निर्मातीकडून मुलाखतीसाठी बोलावणं आलं. मानाचं! स्वत:च्या हिंमतीवर मिळवलेलं! राजू ते पत्र पुन्हा पुन्हा वाचत होता आणि त्याची आई त्याला डोळे भरून पाहात राहिली.


* * *

2693

# भाऊबीज भेट

"ए आई, मी जाऊन येतो ग बाहेर!" असं म्हणत निखिलने पायात चपला घातल्या, "अरे कुठे?" असं विचारत त्याची आई बाहेर आली. पण निखिल तोपर्यंत खाली उतरलाही. गेले दोन महिने ती पाहातेय् - निखिल 'बाहेर जातोय' असंच सांगतोय. 'कुठे' असं विचारायला आईला अवसरच मिळत नाही. मॅट्रिक होऊन आता कॉलेजात जातोय ना! तेव्हा जरा ऐट करणारच म्हणा, असा विचार करून आई कामाला लागली.

निखिल सायकलवरून एका लेखिकेच्या घरी आला. तिला काही लेख तातडीने पाठवायचे होते. मासिकांसाठी! निखिलचं अक्षर सुरेख आहे, नीटनेटकं आहे, म्हणून एका पानाला ५० पैसे या दराने तो तिच्याकडे लेखनिकाचं काम करायला लागला. ११ वीचा कॉलेजचा अभ्यास सांभाळून.


VAZE

निखिलने तिच्याकडून दहा रुपये मिळवले. लेखिकेचंही काम झालं नि निखिललाही पैसे मिळाले. पण त्याला एकूण पंचेचाळीस रुपये हवे होते. तो विचार करू लागला. आता तर परीक्षाही संपली होती. तेव्हा सबंध दिवस तो आर्थिक लाभ करून घेण्यासाठी मोकळाच होता. त्याची आई त्याला परदेशातील खूप गोष्टी सांगायची. तेथील कितीतरी मुले स्वकष्टाने पैसे मिळवून स्वाभिमानाने आपले खर्च भागवतात, उद्योग करतात हे त्याला माहीत होते. आपणही पैसे कमवावे ही त्याची इच्छा होती. त्या इच्छेमागे कारणही होते, पण ते तो कुणाला सांगणार नव्हता. आता उरलेल्या ३५ रुपयांसाठी काय करावं या विचारात तो पडला. मग त्याला एक 'आयडिया' सुचली. त्याने टाळी वाजवली. मोठ्या उत्साहाने तो गोष्ट लिहायला बसला. लेखन करूनही पैसे मिळवता येतात हे त्याने प्रत्यक्ष पाहिले होते. लेखनिकाच्या कामामुळे त्याची भाषाही समृद्ध झाली होती. एकाएकी त्याला त्याच्या स्काऊटच्या दिवसांची आठवण झाली. मग त्याने एक गंमतीशीर, मजेशीर लेख लिहिला. त्याचे ते 'खरी कमाई'चे खरेखुरे अनुभव होते. लेखाचं नाव होतं - 'मी एक बालवीर!' आणि तो लेख त्याने एका बालमासिकाकडे पाठवला. इतका वेळ हा काय लिहितो हे त्याच्या ताईला कळेना. पण काहीतरी नवी कल्पना आहे एवढे तिला समजले. निखिलने लेख छापून आला तर किती पैसे मिळतील यावर डोके खाजवले. पण त्याला काही कळेना. त्यापेक्षा अजून ३५ रुपये कमवावे म्हणून तो घराबाहेर पडला. त्याच्या एका मित्राच्या नात्यात एका वृद्ध गृहस्थांना पुस्तक वाचून दाखवण्यासाठी एका माणसाची जरुरी होती. निखिल

ताबडतोब तिथे पोचला. आठ दिवसांसाठी त्याला पाच रुपये मिळणार होते. रोज अर्धाएक तासाचे काम होते. पण निखिलला ते आजोबा आवडले. शिवाय इंग्रजी वाचता वाचता त्याला कितीतरी ज्ञान प्राप्त झाले. आजोबांनी त्याचे उच्चार सुधारून दिले. ते एक रिटायर्ड मेजर होते. युद्धकथांचा त्यांच्याकडे मोठा साठा होता. निखिलचा तरतरीतपणा, नम्रता, खेळकर वृत्ती त्यांना फार आवडली. म्हणून त्यांनी निखिलला पाच रुपये बक्षीस दिले. अशा रीतीने आठ दिवसांत दहा रुपये कमाई करून आणि एका कुटुंबाशी दोस्ती करून निखिल घरी आला. आई, ताई आणि भाई (त्याचे वडील) यांच्या नजरा चुकवून त्याने पैसे एका डब्यात ठेवले. वीस रुपये जमले होते. त्याने आपला 'पॉकेटमनी' मोजला. तो फक्त पाच रुपयेच होता. एकूण पंचवीस रुपये जमले. अजून वीस रुपये हवे होते. काय करावं या विचारात असतानाच त्याला युक्ती सुचली. त्याच्या एका मित्राच्या मोठ्या भावाने एका क्लबमध्ये 'आनंद मेळावा' भरवला होता तिथे भेळीचा स्टॉल ठेवला होता. त्याला दोन तासांसाठी एका मदतनिसाची जरुरी होती. झालं, मनात विचार येताक्षणीच निखिल बाहेर पडला तो थेट माटुंग्याच्या क्लबमध्ये पोचला. मित्राच्या भावाला मदत करण्याबद्दल पाच रुपये ठरले. निखिलला कांदा कापावा लागला; भेळ बनवावी लागली. नंतर खावीसुद्धा लागली. हिशेबही करावा लागला. खांद्यावर फडका ठेवून हॉटेलच्या पोऱ्याचा 'रोल' करावा लागला. पण एकंदरीत 'धमाल' आली. पाच रुपये खिशात ठेवून निखिलची स्वारी घरी आली. एकूण तीस रुपये जमले होते. रात्री झोपताना पंधरा रुपये कसे कमवावे याचाच तो विचार

करीत होता. कसंही करून या दोन दिवसांत पंधरा रुपये हवेच होते. दुसऱ्या दिवशी निखिल आकाशदिव्याचा कागद कापत होता. सकाळचे दहा वाजून गेले होते. आई फराळासाठी सामान आणायला गेली होती. ताई शिंप्याकडे गेली होती. भाई ऑफिसात! निखिल एकटाच घरी होता. या वर्षी दिवाळीत तो विमानाच्या आकाराचा कंदील बनवणार होता. तोच पोस्टमन आला. त्याचा लेख छापून आलेलं बालमासिक घेऊन! निखिलने घाईघाईने मासिक उघडलं. आणि काय आश्चर्य! त्याच महिन्यात लेखनस्पर्धा होती. त्याच्या लेखाला पंधरा रुपयाचं बक्षीस मिळणार होतं. मानधन रवाना झालेलं होतं. निखिलने अंक लपवून ठेवला. ते त्याचं गुपित होतं. त्याच्या नशिबाने दुपारीच मनिऑर्डर घेऊन पोस्टमन आला. आई-ताई झोपलेल्या होत्या. त्याने सही करून ते रुपये घेतले. त्याला झालेला आनंद शब्दांनी वर्णन नाही करता येणार!

आता निखिलकडे पंचेचाळीस रुपये जमले होते. त्यातले ४० रुपये तर स्वतःच्या बुद्धीवर कमावलेले! ते घेऊन तो पुस्तकांच्या दुकानात गेला. एक सुंदर पुस्तक त्याने विकत घेतले. सुरेख कागदात ते गुंडाळून घेतले. बघता बघता 'भाऊबीज' आली. सकाळीच त्याचे वडील त्याला म्हणाले, ''निखिल, अरे ताईला भाऊबीज म्हणून हे पंचवीस रुपये ठेव.'' पण निखिल गप्प बसला. ताईने त्याला ओवाळले. हळूच त्याने ते पुस्तक तिला 'भाऊबिजे'ची भेट म्हणून दिले. त्याचे आई-वडील त्याच्याकडे आश्चर्याने नि कौतुकाने पाहू लागले. ताईने पुस्तक उघडले. नाव वाचले. 'खिल्ली' ले. पु. ल. देशपांडे. तिने प्रेमभराने आपल्या धाकट्या

भावाकडे पाहिले. ‘‘निखिल, अरे पंचेचाळीस रुपयांचं पुस्तक, तू... तू... विकत...’’ ती गहिवरून म्हणाली. आपल्या ताईला वाचनाची फार फार आवड आहे हे निखिलला माहीत होतं. लायब्ररीचं पुस्तक परत करताना तिच्या किती जिवावर येतं हेही त्याने पाहिलं होतं. पु. ल. देशपांडे हे तिचे अत्यंत आवडते लेखक होते. आपलं स्वत:चं पुस्तक असावं असं ताईला फार वाटायचं. म्हणून तर निखिलने किती कष्टाने ते विकत घेतलं होतं. ‘‘अरे पण पैसे...’’ वडिलांनी विचारलं. मग निखिलने साऱ्या हकिगती सांगितल्या. बालमासिक दाखवलं. ‘‘लब्बाडा! असं होतं तर!’’ त्याचे लाड करत त्याची आई म्हणाली. ‘‘मग? मी आता मॅट्रिक झालोय... भाऊबिजेसाठी आपण स्वत:च पैसे कमवावे असं मला वाटलं.’’ त्याला कौतुकभरल्या नजरेने पाहात ताई म्हणाली, ‘‘म्हणूनच निखू, या वर्षीची भाऊबीज भेट मला फार फार आवडली. कधी विसरणार नाही मी! कारण या नव्या कोऱ्या पुस्तकाला तुझ्या श्रमाचा सुगंध आहे रे!’’

* * *

# नकट्या मनूची गोष्ट

मनू शाळेतून आली ता नाचतच! ''आई, आई, आम्हाला उद्यापासून चार दिवस सुट्टी आहे शाळेला!'' मनू ओरडत म्हणाली. तिचे पुरीसारखे फुगलेले गाल संध्याकाळच्या उन्हातही थोडेसे लालसर झाले होते. काळेकुरळे केस विसकटले होते. नकटं नाक उडवत मनू म्हणाली, ''ए आई, खायला दे ना!'' मनू आपल्याच नादात होती. आई म्हणाली, ''मनू, अग आजी आली आहे बघ गावाहून! आणि हो! आजीने...'' पण आईचं बोलणं ऐकायला मनू तिथे होतीच कुठे? ती आजीच्या कुशीत शिरली. आजीने तिचे मटामटा मुके घेतले. तिला बेसनाचे लाडू खायला दिले. डोळे मिचकावीत छोटी मनू म्हणाली, ''ए आजी, किती तिखट आहे ग लाडू!''

''ए नकटे! आजीची मस्करी करतेस?'' आजी तिला जवळ घेत म्हणाली.

''ए आजी, नकटी आहे का मी?'' मनूने मान हलवत विचारलं. ''अहं! गंमत केली तुझी! छोटी आहेस ना म्हणून!'' आजीने घाबरून म्हटलं. नाहीतर बया भांडायला सुरुवात करणार हे तिला माहीत होतं. दूध पिऊन झाल्यावर मनू लुटूलुटू चालत अंगणात खेळायला गेली. शेजारपाजारची मुलं आधीच येऊन खेळत होती. गौरी मनूला पाहून म्हणाली, ''ए मनू, चल आपण लंगडी खेळूया.'' मनू म्हणाली, ''चल.'' दोघीजणी लंगडी खेळायला लागल्या. खेळता खेळता मनू पडली आणि रडायला लागली. तिने रडत रडत गौरीला एक धपाटा मारला. गौरी चिडली. पण ती स्वभावाने प्रेमळ होती. तिने म्हटलं, ''तुझी तूच पडलीस. मला का मारलंस?'' ''तू मला धक्का दिलास.'' मनूने भांडायला सुरुवात केली. तशी गौरी दुसऱ्या मुलांकडे निघून गेली. मनूला रडताना पाहून तिची मैत्रीण पल्लू तिच्याजवळ गेली. ''मनू, काय झालं?'' तिने विचारलं.

''गौरीने ढकललं.'' मनू म्हणाली.

''बरं! बरं! हे पाहिलंस? मी रुमालाचा छान उंदीर बनवला आहे.'' पल्लू तिची समजूत काढत म्हणाली. ''शी! तुला नीट नाही बनवता येत. मी दाखवते.'' असं म्हणून मनूने रुमालाचा उंदीर बनवायला सुरुवात केली. पल्लवी हिरमुसली. कध्धी म्हणून ही मनू दुसऱ्याला चांगलं म्हणणार नाही. ती निमूटपणे तिचा उंदीर घेऊन निघून गेली. मग मनूला झाडावर रंगीबेरंगी फुलपाखरं दिसली. फुलपाखराचा पंख तोडून तो काड्यापेटीत ठेवावा असं तिला वाटलं. पण एकही

फुलपाखरू तिला मिळेना. सर्व मुलंमुली छानपैकी लपाछपी खेळत होती, पण मनूचं त्यांच्याशी पटेना. शेवटी कंटाळून ती घरी निघून गेली.

तिच्या घरी तिच्या आजीला भेटायला तिची शोभामावशी आणि तिचा मुलगा गोटू आले होते. गोटूने मनूसाठी एक माऊचं चित्र काढून आणलं होतं. तो मनूला म्हणाला, ''ए मनू, हे बघ मी माऊचं चित्र काढून आणलं तुझ्यासाठी!''

''शी! हे कसलं चित्र?'' मनू नाक उडवत म्हणाली. ''ही काय माऊ आहे? ही तर चिऊ आहे.'' मनू त्याला चिडवत म्हणाली. गोटूने मग ते चित्र मनूच्या ताईला देऊन टाकलं. मनूची ताई ते चित्र पाहून खूष झाली. शोभामावशीने मनूला जवळ घेऊन म्हटलं, ''मनू, तुझा फ्रॉक किती छान आहे ग!'' ते ऐकताच मनू खूष झाली. तिने लगेच लाडाने शोभामावशीची पापी घेतली. मनू खुषीत आलेली पाहून शोभामावशी म्हणाली, ''मनू, मला आजीने आणलेला खाऊ देशील?'' मग मनूने तिला लाडू आणून दिले. गोटूला जवळ घेत आजी म्हणाली, ''गोटू खा. आवडला ना?'' ते पाहून मनू चिडली. गोटूला धपाटा मारत ती म्हणाली, ''त्याचे लाड नको करूस.'' ''अग तू ताई ना त्याची? किती छोटा आहे ग तो! त्याला मारतेस?'' आजीने तिला दम दिला तशी मनू म्हणाली, ''मी तुझ्याशी बोलणारच नाही. मी माझ्या मैत्रिणींशीच खेळणार जा.'' मनू रागाने अंगणात निघून गेली. तिची आई शोभामावशीला म्हणाली, ''बघ ग, आता तिसरीतली मुलगी ही! पण जराही कुणाशी पटत नाही!'' असू दे ग! कळेल हळू हळू!'' शोभामावशीने मनूच्या आईची समजूत घातली. मग आजी आणि तिच्या

दोन्ही लेकींच्या गप्पा रंगल्या. गोटू एकटाच चित्र काढत बसला. मनूची ताई अभ्यास करत बसली.

इतक्यात मनू खेळून घरी आली. ती सर्व मैत्रिणींवर चिडलेली होती. ''काय ग झालं?'' आजीने विचारलं. ''पल्लवी वाईट आहे, निनाद वाईट आहे, प्राची वाईट आहे, गौरी वाईट आहे. ती लपून बसते तेव्हा मला तिला शोधताच येत नाही. म्हणून मी तिला चिमटा काढला तर ती चिडली. ती म्हणाली, मनूशी कुण्णी खेळायचं नाही.'' मनू तावातावाने बोलत होती.

''मग?'' आजीने विचारलं.

''मग काय? गौरी, राजू, प्राची, अनू, राणी, निनाद सगळे सगळे मला चिडवायला लागले. म्हणाले,

चिडकू भडकू मनू.

मग मला राग येणार नाही का? मला कोणीच खेळायला घेत नाहीत.'' मनू आता रडायला आली होती.

''बरोबर आहे. तू सगळ्यांना नावं ठेवतेस. सारखं स्वतःचंच कौतुक! सगळ्यांशी भांडतेस. कोण खेळणार तुझ्याशी?'' आजी तिला समजावत म्हणाली.

''मी खेळणार!'' गोटू म्हणाला.

''ए मनू, हे बघ मी वाघाचं चित्र काढलं!'' त्याने तिला चित्र दाखवलं. मनू एकदम ओरडणार होती, ''शी! हा कसला वाघ? हा तर कुत्रा आहे.'' पण मग तिला कळलं, आपण जर सगळ्यांशी असे वागलो तर आपल्याशी खेळणार तरी कोण? आपला नवा फ्रॉक, नवा खेळ, नवी पुस्तकं बघणार तरी कोण? आजीचं बरोबर आहे! ती हळूच म्हणाली, ''छान आहे वाघोबा!'' तसा गोटू म्हणाला,

''खरंच? चल, आपण चित्र काढूया!'' मनूला मित्र मिळाला. ती गोटूबरोबर चित्र काढण्यात गुंग झाली. मनाशी ती म्हणत होती, पल्लवीचा रुमालाचा उंदीर छान होता हे तिला उद्या सांगायला हवं!

* * *

# परीचं राज्य

2523

दुपारची जेवणं आटोपली. आज रविवार असल्यामुळे ज़ेवायला जरा उशीरच झाला होता. राजू आईच्या कुशीत शिरत म्हणाला,

''आई, झोप आली.'' मग आईने त्याला पलंगावर ठेवलं नि ती त्याच्या शेजारी झोपली. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत त्याला थोपटू लागली. आईच्या कुशीत शिरल्याखेरीज राजूला झोपच लागत नसे.

''आई, गोष्ट सांग ना!'' राजू लाडात येत म्हणाला.

''बरं बाबा! सांगते. परीची सांगू?'' आईने विचारलं.

''हो. सांग सांग!'' राजू खूष होत म्हणाला. त्याच्या शाळेतल्या बाईंनीही त्यांना परीबद्दल खूप माहिती सांगितली होती. राजूला परी फार आवडू लागली होती. म्हणून तो म्हणाला, ''आई, सांग ना परीची गोष्ट!

आईला राजूची गंमत करावीशी वाटली. ती म्हणाली, ''लहान का आहेस परीची गोष्ट ऐकायला ?''

''बरं तर! मी मोठा आहे ना? मग मला एकट्याला आजीकडे पाठवशील ?'' पाच वर्षांच्या राजूने मोठ्या ऐटीत विचारले.

''लब्बाड कुठचा!'' त्याचा गालगुच्चा घेत आई म्हणाली, ''इतक्या छोट्या मुलाला आगगाडीतून इतक्या दूर कुणी पाठवील का सोन्या ?''

''मग मला परीची गोष्ट सांग ना! छोटा आहे ना मी ?'' राजूने आईच्या गळ्यात हात टाकत विचारलं.

''हं, ऐक. एक होती परी. निळ्या निळ्या आकाशात तिचा निळा महाल होता.'' आई गोष्ट सांगू लागली. ''ए आई, महाल म्हणजे ग काय ?'' राजूने विचारलं.

''महाल म्हणजे राजवाडा! हं, तर ती परी होती ना तिचं नाव होतं चंदा! गोरी गोरी, लाल लाल ओठांची आणि मोठ्या मोठ्या टपोऱ्या काळ्याभोर डोळ्यांची!''

''पुढे ?'' राजूला आता झोप येत होती. ''तिला छानसे निळे पंख होते दोन! कळलं ?'' पण ते ऐकायला राजू होताच कुठे? तो तर केव्हाच परीच्या पंखांवर बसला होता आणि हवेत उडत होता.

राजूने परीला म्हटलं, ''ए चंदा, तू इतकी गोरी गोरी कशी ग ?''

''किनई राजू, मी चांदण्यांनी नहाते, चांदोबाच्या शुभ्र प्रकाशात बसते, आणि म्हणून तर मी अशी गोरी आहे, कळलं ?'' परी गोड आवाजात बोलत होती.

''ए, तुझा आवाज चॉकलेटसारखा गोड आहे ग!'' राजू खुषीत येऊन म्हणाला. ''ए, बघ तरी. सगळी माणसं, घरं, झाडं मुंग्यांएवढी दिसत आहेत.'' राजू तिच्या पंखांवरून खाली पाहात म्हणाला.

''गंमत येते ना? मग? चल, आलं माझं घर! 'नीलमहाल' नांव आहे बरं का!'' परी तिच्या महालाच्या अंगणात उतरत म्हणाली. राजूने पटकन तिच्या पंखांवरून उडी मारली आणि तो आश्चर्याने त्या निळ्या आकाशातल्या निळ्या राजवाड्याकडे पाहात बसला. परीने त्याचा चिमुकला हात धरला आणि ती त्याला महालात घेऊन गेली. तिच्या महालाला बिस्किटांचे दरवाजे होते. चॉकलेटच्या खिडक्या होत्या. केकचे छत होते. राजूने हळूच दरवाज्याला जिभेने चाटून पाहिलं. वा! क्रीम बिस्किट होतं ते! राजू आनंदून गेला. परीने म्हटलं, ''तुला बिस्किटं हवी आहेत?''

तसा राजू लाजला. म्हणाला, ''नंतर खाईन. ए पण, या खिडक्यांची चॉकलेटं खरी आहेत?''

''हो. खा ना.'' राजूने मग एक चॉकलेट घेतलं आणि खाल्लं. असं चॉकलेट त्याने कधीच खाल्लं नव्हतं.

''ए कित्ती मस्त आहे ग!''

''हो ना? चल आपण फिरूया.'' परी म्हणाली. राजू परीबरोबर खूप फिरला. तिच्या राज्यात सरबतांच्या नद्या वाहात होत्या. लाडवांचे डोंगर होते. झाडांना गोळ्या लागल्या होत्या. सर्वत्र नुसती मजाच मजा होती. आईस्क्रीम, चिंगम, फुगे, पतंग आणि चित्रांची पुस्तकं यांनी पऱ्यांची घरं भरलेली होती.

''ए चंदा, तुमच्या राज्यात शाळा नाही?'' राजूने उत्सुकतेने विचारलं.

''आहे ना! ती बघ.'' एका शुभ्र साखरेच्या इमारतीकडे बोट दाखवत परी म्हणाली. ''पण आमच्या इथे आठवड्यातून एकदाच शाळा असते. मुलांना आम्ही गाणी शिकवतो, गोष्टी सांगतो, खाऊ वाटतो. कधी कधी सहलीला नेतो.''

''आणि अभ्यास?'' राजूने आश्चर्याने विचारलं.

''हाच अभ्यास.'' परी म्हणाली.

''कित्ती मज्जा! मी इकडेच राहू का ग? मग मलाही अभ्यास नाही, रोज रोज शाळा नाही, रोज केक, गोळ्या, आईस्क्रीम, बिस्किटं मिळतील खायला! खरं ना?'' राजूने विचारलं.

''हो तर! मग राहणार ना?'' परीने राजूची पापी घेत म्हटलं.

''हो हो.'' राजू ऐटीत म्हणाला. थोड्या वेळाने राजूला तिने सरबत दिले, फळं दिली, खूप खूप खाऊ दिला. मग ती म्हणाली,

''चला राजूदादा, चांदोबाचा दिवा लागला आकाशात! आता झोपूया.''

राजू म्हणाला, ''बरं'' मग परीने त्याला मऊमऊ गादीवर ठेवलं. मऊमऊ उशी दिली. आणि छान लाल रेशमी मऊमऊ दुलई त्याला पांघरायला दिली. परी म्हणाली, ''आता झोप हं बाळा!'' पण एकाएकी राजूला त्या गादीवर झोपावंसं वाटेना. तो म्हणाला,

‘‘ए परी ग, मला माझी आई हवी! तिच्या कुशीत मी झोपणार!’’

‘‘अरे पण इथे किती मज्जा आहे. शाळा नाही, खूप खेळ आहे, खाऊ आहे.’’ परी म्हणाली.

‘‘अंहं! मला काहीसुद्धा नको हे! मी घरी जातो. मला आई हवी.’’ राजू रडायला लागला. ‘‘बरं बरं! उद्या सकाळी जाऊ हं!’’ राजूची समजूत घालत परी म्हणाली.

‘‘नाही नाही! उद्या नाही! आत्ताच!’’ राजू ओरडला. ‘‘आई हवी मला! आई!’’ राजू जोरजोरात रडत म्हणाला.

‘‘अरे, अरे! राजू, काय झालं?’’ त्याला जवळ घेत आईने विचारलं. राजू जागा झाला आणि आईला पाहून त्याला खूप बरं वाटलं. ‘‘अरे, मी इथेच आहे. स्वप्न पडलं का?’’ आई विचारत होती.

‘‘अं... अग परी कुठे गेली? मी तर तिच्या निळ्या पंखांवरून निळ्या महालात गेलो होतो...’’ राजू म्हणाला.

‘‘अरे वेड्या ते स्वप्न होतं! गोष्ट ऐकता ऐकता तू झोपलास आणि स्वप्नात परीच्या राज्यात गेलास! हो ना?’’ आईने विचारलं.

‘‘अं.. हो! ए आई पण, मला आपलं घरच आवडतं ग! इथेच खूप मज्जा आहे.’’ राजू असं का म्हणतो ते आईला कळलंच नाही. मग राजू म्हणाला, ‘‘ए आई, परीच्या राज्याची गंमत सांगायला मी निखिलकडे जातो ग!’’ आणि तो पळत सुटला.

* * *

# ...आणि पोपट बोलू लागला

खूप हट्ट करून राजूने शेवटी एक पोपट विकत आणलाच. पोपटाचा पिंज़रा त्याने त्याच्या खोलीत एका दांडीला टांगला. ''अरे अरे विठू, आवडलं ना आमचं घर?'' त्याने दांडीवर बसून झोके घेणाऱ्या पोपटाला विचारलं. राजूच्या ताईलाही तो पोपट फार आवडला.

बघता बघता पोपटाला त्यांच्या घरी येऊन महिना झाला. पण बेटा दुःखीच दिसायचा. राजू त्याला लाल पेरू, भिजवलेली डाळ नि लाल मिरची द्यायचा. कधी कधी चॉकलेटही द्यायचा प्रेमाने! पण विठू मात्र सर्वांपासून अलिप्त राहायचा. थोडंसं खायचा. पाणी प्यायचा. पण सारखा घुम्यासारखा दांडीवर बसून राहायचा. ''ए, बोल ना रे!'' एकदा राजू त्याची कित्ती कित्ती विनवणी करत होता. पण




. . .आणि पोपट बोलू लागला / ४९

पोपट गप्प बसला. ''ए, ताई, त्याला आपण दुसरा एक प्लॅस्टिकचा पोपट आणून देऊ या का? त्याला मित्र नाही ना, म्हणून तो बोलत नसणार!'' राजूची ताई पुस्तक वाचण्यात गढून गेली होती. नंदुरबारच्या शिरीषकुमारची मोठी धाडसी आणि स्वाभिमानी व्यक्तिमत्त्व दर्शवणारी गोष्ट वाचता वाचता ताई जणू पारतंत्र्याच्या दिवसांतच वावरत होती. इंग्रजांचे भारतीय मुलांवर झालेले अत्याचार वाचताना तिच्या हृदयात कालवाकालव झाली. पण तरीही हातातील तिरंगी झेंडा मात्र प्राणपणाने उंच ठेवणाऱ्या भारतीय बालकांच्या शौर्यकथा वाचून ताईच्या अंगावर काटा उभा राहिला. नऊ-दहा वर्षांची कोवळी मुलं! पण देशाभिमान किती वाखाणण्यासारखा! ताई इतकी दंग झाली त्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या गोष्टींत, की राजूचा प्रश्नही तिने ऐकला नाही.

तिच्या हातातील पुस्तक ओढत राजू पुन्हा म्हणाला, ''ए ताई, ए सांग ना ग? आपला हा पोपट असा गप्प का? ए, आपण त्याचं नाव ठोंब्या ठेवूया का?'' ''राजू, ते जाऊ दे. अरे, हे पुस्तक बघ तरी. हे बघ हं, तू आहेस आठ वर्षांचा आणि मी आहे दहा वर्षांची! अरे, या पुस्तकातली शूर मुलं आपल्याएवढीच होती. हे पुस्तक मुद्दाम वाच.'' राजूने ते पुस्तक चाळले नि आपल्या दप्तरात ठेवले. ''मग वाचीन ग ताई!'' तो म्हणाला. ''पण या राघूला बघ ना! लब्बाड, आपल्याशी कट्टी करून बसलाय!'' राजू गाल फुगवून बसला. ''मोठ्ठा आलाय पोपटोबा बिपटोबा! कट्टी करतोस होय रे चोरा?'' असं म्हणत ताईने त्याचा पिंजरा हलवला. पंखांची फडफड करीत पोपट दांडीवरच बसून राहिला. संध्याकाळी ताई गच्चीवर खेळायला गेली.

राजू, तनू, चिंगी, मनू वगैरे बालगोपाळही बरोबर होतेच. मंद वाऱ्याची झुळूक सुटली आणि मुलांनी वारा नुसता पिऊन घेतला. ''किती मजा येते ग असा वारा आला की!'' ताई म्हणाली. 'ए, एक चांदणी! एक चांदणी! बघ, बघ आकाशात एकच चांदणी उगवलीय. मागा मागा लवकर!'' ताई आकाशात निरखून बघत म्हणाली. मग सगळ्या मुलांनी डोळे बंद केले. कुणी गणिताच्या परीक्षेत पास कर म्हणून त्या इवल्याशा चांदणीला साकडे घातले तर कुणी बाईच आजारी पडू दे अशी मागणी करून मारकुट्या बाईंवर सूड उगवला. कुणी रंगीत पेन्सिली आणायची बाबांना बुद्धी दे असं त्या चांदणीला विनवलं तर कुणी नवा फ्रॉक दे अशी त्या चांदणीची मनधरणी केली. ताई पुटपुटत होती, 'ए चांदणी, मला त्या छोट्या मुलांसारखा, त्या ग, मी दुपारी वाचत होते ना, त्या पुस्तकातल्या मुलांसारखा धीटपणा दे. शौर्य दे!'' राजू मागत होता, 'ए चांदणी, मला एकच गोष्ट हवीय ग! तू किनई आमच्या पोपटाला बोलायला लाव ग! त्याला म्हणावं, ''राजू चांगला आहे त्याच्याशी मैत्री कर.''

सगळ्यांनी मग डोळे उघडले. ''ए, कुणी सांगू नका हं. काय मागितलं ते! नाहीतर चांदणी देत नाही.'' ताईनं म्हटलं.

मग सगळेजण फतकल मारून आरामात गोलाकार बसले. खेळून खेळून ते दमले होते. सहज सगळीजणं आकाशाकडे पाहात होती. तोच सुंदर असा पोपटांचा थवा ओरडत त्यांच्या डोळ्यांपुढून एकदम उडत गेला. निळसर आभाळाच्या पार्श्वभूमीवर तो हिरवागार डौलदार पक्ष्यांचा उडणारा थवा मुलांना भारी आवडला, ''अय्या, काय सुंदर पोपट ग!''

असं म्हणत ताई त्यांच्यामागे धावली. सगळी उठून गच्चीच्या कठड्याजवळ गेली आणि त्या गोजिरवाण्या पक्ष्यांना दृष्टीआड होईपर्यंत न्याहाळत राहिली. ''काय मस्त ओरडत होते ग ताई ते पोपट!'' राजू म्हणाला.

''ए, ते कुठे ग चालले असतील?'' तनूने विचारलं. ''कुठे म्हणजे ग काय तनू? घरी! आपण नाही का तिन्हीसांजा झाल्यावर घरी जात! तसेच!'' ताईने आपल्या वेण्यांना झोके देत म्हटलं. ''पण मग त्यांचं घर कुठे?'' तीन वर्षांच्या मनूने विचारलं. ''रानात!'' तिला उचलून घेत ताई म्हणाली. ''राजू, ताई, चला खाली. अंधार पडला. हातपाय धुवून परवचा म्हणा.'' खालून आई ओरडली. तशी सगळी मुलं घराच्या ओढीने जिने उतरू लागली.

रात्री जेवताना बाबांनी म्हटलं, ''अरे राजू, तुझा दोस्त एकदम शांत आहे बुवा! अरे, त्याला म्हणावं, थोडी बातचीत कर आमच्याबरोबर!'' राजू त्यावर काहीच बोलला नाही. ''काय ताई, सध्या तुम्ही काय वाचता? तुमचं देशप्रेम काय म्हणतं?'' बाबांनी ताईचा गालगुच्चा घेत विचारलं. आपला गुलाबी गाल चोळत ताई फुरंगटून म्हणाली, ''असं हो काय बाबा!'' ''अग कौतुकाने विचारतोय मी!'' बाबांनी तिच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं. ''सध्या स्वारी शिरीषकुमारात दंग आहे म्हटलं.'' आईने सगळ्यांना मुखशुद्धीसाठी चिकूची एकेक फोड देत म्हटलं. ''हो किनई बाबा, त्यात असं लिहिलंय की, पारतंत्र्यातलं जगणं म्हणजे मरण आणि स्वातंत्र्यातील मरण म्हणजे जगणं होय! म्हणून तर बाबा शिरीषकुमार, बाबू गेनू, भगतसिंग यांनी प्राणपणाने लढून आपल्या देशाला स्वतंत्र

करण्याचा प्रयत्न केला.'' ''वा, बरंच लक्षात ठेवलंयस की!'' तिचं कौतुक करीत बाबा पुढे म्हणाले, ''अरेच्या, दहा वाजले. आईने दूध आणलंय् ना ते प्या बघू आणि झोपा आता!'' मग मुलांनी दुधाचे प्याले तोंडाला लावले. थोड्याच वेळाने दोघंही गाढ झोपी गेले.

नंतरचे जवळजवळ आठदहा दिवस मुलांच्या कसल्या ना कसल्या तरी परीक्षाच होत्या. त्यामुळे पोपटाकडे जास्त लक्ष देण्यास राजूला वेळच मिळाला नाही. पण जेव्हा जेव्हा तो त्याला खायला द्यायला जाई तेव्हा तेव्हा त्याला कळवळून सांगे, ''ए, बोल ना रे! खेळ ना रे माझ्याशी!'' पण पोपट सत्याग्रहीसारखा ढिम्म बसून राही. त्यादिवशी असाच राजू सकाळी त्याच्या वाटीत भिजलेली डाळ ठेवत होता. पण पोपटाने त्याच्याकडे पाहिलेही नाही. पिंजऱ्यासमोर बसून राजू म्हणाला, ''आज मी तुझ्या तोंडचा एक तरी शब्द ऐकणारच! बोल ना रे माझ्याशी!'' तोच ''आई आई'' अशी ताईची हाक त्याला ऐकू आली. तो धावतच गेला. ताईने आंघोळ करताना आतून कडी लावली ती खूप घट्ट बसली. बराच वेळ कोंडून राहिल्यामुळे ताई मदतीसाठी ओरडत होती. मग बाबांनी बाहेरून लोखंडी तार घालून एकदाची कडी काढली.

तशी घामाघूम झालेली ताई बाहेर आली. ''अरे वा, आमची झाशीची राणी घाबरली वाटतं?'' बाबांनी विचारलं. ''मुळीच नाही.'' ताई उद्गारली. ''पण आत कोंडल्यामुळे मला गुलामगिरीचं दुःख कळलं. एकटेपणाचं दुःख कळलं. पारतंत्र्याचे हाल समजले. बाबा, पाच मिनिटं मी आत कोंडून राहिले तर, तर माझा जीव कासावीस

झाला...'' असं म्हणून ताई तडक पोपटाच्या पिंजऱ्याजवळ गेली. तिनं क्षणाचाही विचार न करता पिंजऱ्याचं दार वर केलं. उडायचंसुद्धा विसरलेला तो पोपट बाहेर येईचना. मग त्याला ताई गोड शब्दात म्हणाली, ''पोपटभाऊ, ये. खरंच बाहेर ये. आकाशात उडून जा!'' पोपट बाहेर आला. मोकळ्या हवेत श्वास घेताच त्याने तोंडातून 'विठू विठू' असा सुरेल आवाज काढला. मान वेडीवाकडी करत त्याने सगळ्यांना पाहिले. आई, बाबा, राजू आणि त्याची लाडकी ताई! सगळ्यांच्या पुढून तो पंख हलवत गगनात भराऱ्या मारायला उडून गेला. आनंदाने शीळ घालत! ''आत्ता पोपट बोलला ग!'' राजू उद्गारला. ''ताई... अग हे तू...'' बाबांना बोलायलाच सुचेना. ''बाबा, रागावू नका. मला नाही असं कोंडून राहायला आवडलं म्हणून मला पोपटाचं दुःख कळलं. म्हणून मी त्याला सोडलं. आज त्याचा स्वातंत्र्यदिन उगवला! ज्याला स्वातंत्र्य आवडतं त्याने दुसऱ्याला पारतंत्र्यात का ठेवावं?'' आपल्या तेजस्वी मुलीकडे पाहात बाबा म्हणाले, ''तुझ्यावर मी का रागावणार? उलट मला आज तुझा अभिमान वाटतो. इतकी वर्षं जे आम्ही पुस्तकातून नुसतं शिकलो ते तू कृतीतून दाखवलंस!''

* * *

# ‘सारे माझे मी साऱ्यांची’

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय
बाल साहित्य विभाग
क्र. 2593 दिनांक
विषय ... ... क्र.

बेबी आरशापुढे उभी राहून कंगव्याने केस विंचरत होती. आईने विंचरलेले केस काही तिच्या मनाला आले नव्हते. मावशीने वाढदिवसाला दिलेला नवा लाल फ्रॉक तिने घातला होता. त्याच्यावर छानसं भरतकाम केलं होतं मावशीने ! भरजरी फुलपाखरं होती ती ! बेबीला तो फ्रॉक भारी आवडायचा. ‘‘हं, बेबी, हा घे खरवसाचा डबा. आजीला म्हणावं, राजूमामासाठी दिला आहे.’’ आईने बेबीच्या नव्या पिशवीत डबा ठेवत म्हटलं. ‘‘ए आई, पण अजून सुमा कशी नाही आली ग ?’’ बेबीने विचारलं.

‘‘ही काय ! मी आले !’’ सुमा बेबीच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाली.

''अय्या! सुमा! तुझा फ्रॉक किती छान आहे ग! निळ्या आकाशासारखा रंग आहे अगदी!'' बेबी सुमाच्या फ्रॉकला हात लावत म्हणाली. ''खरंच?'' सुमा आनंदून म्हणाली. ''चला, चला, निघा. आणि काळोख पडायच्या आत या.'' आईने दोघींना पिटाळले.

बेबीच्या मामाकडे जाणारा रस्ता छानशा बागेतून होता. बागेत कितीतरी फुलझाडं होती. गुलाब, मोगरा, शेवंती, अबोली, डेलिया, जाई, जुई, कृष्णकमळ, अनंत, तगर अशी वेगवेगळ्या रंगांची, रूपांची आणि वासांची फुलं त्या बागेत फुलत होती. संध्याकाळचा थंडगार वारा वाहात होता. बेबी आणि सुमा खूष झाल्या. बागेतल्या एका बाकाजवळ एक छोटसं कुत्र्याचं पिल्लू होतं. त्याचा रंग पांढराशुभ्र होता आणि त्याच्या कपाळावर एक काळा ठिपका होता. सुमा म्हणाली, ''अय्या, कित्ती छान आहे ग हे पिल्लू! बघ तरी. याचं अंग किती मऊ मऊ आहे!'' बोलता बोलता सुमा त्याच्या पाठीवरून हात फिरवू लागली. ते पिल्लूही तिला बिलगलं. ''ए, आणि हा काळा ठिपका बघ ना! लहान बाळाला तिटी लावतात ना काजळाची गालावर, तसा आहे. हो ना ग?'' सुमाला ते इवलंसं पिल्लू पाहून कित्ती म्हणून आनंद झाला होता. पण बेबी गप्पच! मग म्हणाली, ''पुरे झालं ग तुझं कौतुक! पण या पिल्लाची शेपटी मात्र मस्त आहे. ओढायला!'' बेबीने त्या पिल्लाची शेपूट धरली आणि ओढली. ते पिल्लू केकाटायला लागलं तशी बेबी जोरजोरात हसायला लागली. बिचारी सुमा मात्र कासावीस झाली. इतक्यात बेबीने एक दगड उचलला आणि त्या पिल्लाच्या पायावर मारला. ''अग अग, बेबी, हे काय?'' सुमाला

आता राहवलं नाही. पिल्लाचा पाय मात्र दुखावला आणि ते ओरडत, लंगडत चालायला लागलं. ''अग का बिचाऱ्याला त्रास दिलास ?'' सुमाने कळवळून विचारलं.

''मला मजा वाटते म्हणून !''

''यात कसली मजा ? त्याच्या जिवाला दुखवून तुला कसली मजा आली ?'' सुमाने थोडंसं रागाने विचारले. पण बेबीने तिकडे लक्षच दिले नाही. दोघीही मग झपाझपा चालू लागल्या. फुलांवर उडणारी रंगीबेरंगी फुलपाखरं पाहून सुमा म्हणाली, ''किती सुरेख दिसतात ग ही फुलपाखरं ! पंख तरी बघ ! कसे निळेजांभळे आहेत. आणि बेबी, त्यांच्यावर सोनेरी ठिपके सुद्धा आहेत.'' ''बघू बघू'' असं म्हणत बेबी त्या फुलपाखरांजवळ आली. ''खरंच ! मस्त आहेत पंख ! आता हे तोडून मी पुस्तकात ठेवीन.'' असं म्हणत बेबीने चतुराईने एक फुलपाखरू पकडलं आणि त्याचा पंख तोडला. बिचारं फुलपाखरू झाडाखाली मातीत पडून राहिलं. सुमा मात्र बेबीवर चिडली आणि म्हणाली, ''काय ग बेबी, तू अशी का वागतेस ?''

''मला आवडतं म्हणून !'' बेबी म्हणाली. मग दोघी पुढे चालू लागल्या. बेबी चालताना पानं तोड, फुलं कुस्कर असं काहीतरी करतच चालत होती. शेवटी एकदाचं आजीचं घर आलं. ''आजी, राजूमामा कुठे ग ?'' बेबीने विचारलं. ''ये बाळ. ये सुमा. बसा. राजूमामा बाहेर फिरायला गेला आहे.''

''आणि मामी ?''

''मामीसुद्धा! पण मी आहे ना? आजोबाही आहेत की! आत वाचत बसले आहेत.'' आजीने बेबीचे लाड करत म्हटलं.

''अय्या! खरंच! घे हा डबा. खरवसाचा! राजूमामासाठी दिला आहे.'' असं म्हणत बेबीने डबा आजीच्या हातात दिला आणि ती धावतच आजोबांना भेटायला त्यांच्या खोलीत गेली. ''आजोबा, आजोबा'' असं म्हणत ती त्यांच्या गळ्यात पडली.

''अरे वा! कधी आली बबडी?'' तिला जवळ घेत आजोबा म्हणाले.

''आणि ही सुमा का? वा!वा! बसा. आजीकडून खाऊ मिळाला ना?'' आजोबांनी विचारलं.

''हो तर! हा घ्या शिरा.'' असं म्हणत आजीने शिऱ्याच्या बशा त्या दोघींच्या हातात दिल्या. आजोबांनी बेबीला आणि सुमाला चॉकलेट्स् दिली.

खाऊन पिऊन बेबी नि सुमा जायला निघाल्या. आपल्या नव्या पिशवीत आजीने दिलेला वड्यांचा डबा ठेवत बेबी म्हणाली, ''आजी टाटा! आजोबा टाटा! मी निघते.''

''नीट जा.'' आजी म्हणाली.

बेबी नि सुमा घराच्या रस्त्याला लागल्या. त्या दोघी बागेतून येताना एकदम एक गांधीलमाशी बेबीच्या मागे धावली. बेबी घाबरून पळायला लागली तशी तीही तिच्या मागे पळत सुटली आणि बेबीच्या गालाला चावली. बेबीने हाताने तिला झटकलं. पण तिला ती गालाला चावल्यामुळे दुखायला लागलं. बेबी रडायला लागली. तशी सुमा म्हणाली,

‘‘बेबी, तू फुलपाखराचा पंख तोडलास ना म्हणून तुला ही शिक्षा! कळलं?’’ बेबी गाल चोळत चोळत चालत राहिली. इतक्यात एक कुत्री आली आणि तिने बेबीची नवी पिशवी तोंडाने ओढून दातांनी फाडून टाकली. पिशवीतल्या डब्यातल्या वड्या मातीत पडल्या. बेबी आपल्या आवडत्या पिशवीची दशा पाहून जोरज़ोरात रडायला लागली. मग ती कुत्री त्या लंगड्या पिल्लाजवळ जाऊन बसली.

‘‘पाहिलंस बेबी? तू विनाकारण त्या पिल्लाला दगड मारलास ना म्हणून तुला ही शिक्षा मिळाली.’’ सुमा तिची पिशवी, डबा उचलत म्हणाली.

बेबी आणि सुमा घरी आल्या तेव्हा बेबीचा तो रडवेला चेहरा, मळलेला फ्रॉक आणि गालावरचा डाग पाहून तिची आई तिच्याजवळ जात म्हणाली, ‘‘अग, हे काय? पडलीस?’’ बेबी न बोलता रडत राहिली. मग सुमाने सगळी हकीगत सांगितली तशी आई म्हणाली, ‘‘अग, या निसर्गातील प्राणी, पक्षी, कीटक, झाडे, माती, डोंगर सारे सारे आपल्यासाठी खूप उपयोगी आहेत. अग, सर्वांवर प्रेम करायला शीक. भूतदया दाखव. तू सर्वांशी प्रेमाने वागलीस तर तुझ्याशीही सगळे चांगले वागतील.’’ बेबीला आईचं म्हणणं पटलं. आईच्या कुशीत शिरून ती म्हणाली, ‘‘सारे माझे मी साऱ्यांची हेच खरं!’’

* * *

# बबू

बालमित्रानो,

ही कथा आहे बबूची! बबू नावाची एक सुरेख गोड मुलगी होती. 'तिचं वय होतं काहीतरी सात-आठ वर्षांचं! हसली की बबूचे करवंदी डोळे चमकायचे. गोबऱ्या गोबऱ्या गालांवर खळी पडायची. बबू सारखी काही ना काही करत असायची. कुठे झाडाला पाणी घाल; तर कुठे आईला वाण्याकडून सामान आणून दे, असं तिचं काही ना काही चाललेलं असायचं. बबूला वाचनाची फार आवड! काहीच उद्योग नसला की बबू पुस्तकं वाचायची. त्यामुळे बबूला कितीतरी ज्ञान मिळत असे.

त्या दिवशी होता शनिवार. शाळा सकाळची असल्यामुळे बबू दुपारी जेऊन मैत्रिणींना जमवून खेळत होती. मिनी, राणी, सोनी आणि टिंगी अशा साऱ्या जमल्या होत्या.


YAZE
बबू / ६१

बबूच्या बाहुलीचा आज वाढदिवस होता. बबू आईची जुनी साडी नेसली होती. चांद्यांचे दागिने बाहुलीला घातले होते त्यांनी! गूळ, खोबरे, दाणे वगैरे खाऊ जमवून भातुकली रंगात आली होती. तोच शेजारचा टम्या आला. टम्या बबूच्याच वर्गात होता. भारी दांडगट! तो म्हणाला, ''ए बबू, मी बघ काय खातोय?'' बबूने आणि तिच्या गँगने त्याच्याकडे पाहिले. टम्या खात होता कैरी! तिखटमीठ लावून, कैरी आणखीनंच चवदार करून टम्या मिटक्या मारीत होता. हातातल्या बाहुलीला फेकून देऊन बबू त्यांच्याजवळ गेली. म्हणाली, ''मला दे ना रे!'' ''हॅट! तुम्ही जाऊन पाडा आणि खा!'' टम्याने सांगितले. कळ लावून टम्या पळून गेला.

बबू आणि तिच्या मैत्रिणी देवधरांच्या बागेकडे निघाल्या. जाताना बबूने रिकाम्या काड्यापेट्या नि शाईच्या दौती बरोबर घेतल्या. बागेत गेल्यावर बबूने फुलपाखरं, आणि नाकतोडे पकडून काड्यापेट्यांना छिद्रं पाडून त्यात ठेवून दिले. मिनी म्हणाली, ''बबू, चल. आपण आता कैऱ्या काढूया ना.'' तशी सगळ्याजणी कैऱ्यांना दगड मारू लागल्या आणि त्यांनी कैऱ्या पाडल्या. ''ए लवकर गोळा करा ग,'' टिंगी म्हणाली, ''ए, ही मी पाडलीय. मोठ्ठी आलीय आयती घ्यायला!'' राणी म्हणाली, ''ए भांडताय काय, तो बघा माळी येतोय!'' सोनी ओरडली. सर्व मुलींनी पाहिलं तो काय, माळीबुवा काठी घेऊन येतच होते. त्याला बघून सगळ्याजणी पळाल्या. बबू तेवढी माळ्याच्या हातात सापडली. माळ्याने तिला दरडावून विचारले, 'ए पोरी, चोरी करतेस? चल, तुझ्या आईला सांगतो.'' बबू आता

घाबरली. तिने जोरात रडायला सुरुवात केली. रडता रडता म्हणाली, ''माळीदादा, मी बघा फुलपाखरं गोळा केली. कैऱ्या मी नाही पाडल्या. त्या लबाड मुली पळाल्या!'' माळ्याने काड्यापेटी उघडली. छोटी छोटी गोजिरवाणी फुलपाखरं तडफडत होती. माळ्याने त्यांना सोडून देण्यासाठी बबूला विनंती केली. पण बबू गाल फुगवून म्हणाली, ''वा माळीदादा, मी एवढी धावपळ करून त्यांना पकडलं नि आता सोडू? मुळीच नाही!'' मग माळीदादाने बबूला आऊटहाऊसमध्ये बंद केलं. तशी बबू रडायला लागली. म्हणाली, ''मला मोकळ्या मैदानात फिरायचंय्! घरी जाऊन वाचायचंय्! मला कोंडून ठेवू नका हो माळीदादा!'' तशी माळीदादा म्हणाला, ''मग या गरीब बापड्या फुलपाखरांना तू का डांबलंस? मी त्यांना सोडून देतो! त्यांनाही बागडू दे, उडू दे!'' बबूला पटलं, ''पुन्हा नाही हं मी असं करणार!'' दरवाजाच्या बाहेर येत बबू म्हणाली आणि धावू लागली. तिला पकडत माळी म्हणाला, ''कैऱ्या चोरत होतीस ते विसरलीस? चल मालकांकडे!'' आता मात्र बबूची भीतीने गाळण उडाली. ती अजीजीने म्हणाली, ''माळीदादा, मी तुमचं ऐकलं ना? मग मला एकदा सोडून द्या. पुन्हा मी त्या मुलींबरोबर नाहीच येणार! खरंच.'' माळीदादाला छोट्या बबूची गंमत वाटली. एवढ्यात बबूने फ्रॉकच्या खिशातून एक चॉकलेट बाहेर काढलं नि माळीदादाला देत म्हटलं, ''हे घ्या! मस्त लागतं!'' माळीदादा म्हणाला, ''नको ग पोरी, तूच खा! आणि ही घे एक कैरी! जा पळा!'' बबू अत्यानंदाने पळत घराकडे निघाली. तोच तिला टिंगीने ठलं. पाठोपाठ राणी, सोनी व मिनीही आल्या. म्हणाल्या,

''ए, आम्हाला पण दे ना थोडासा तुकडा कैरीचा!'' बबू त्यांना अंगठा दाखवत म्हणाली, ''लबाड कुठच्या? मला माळीदादाने पकडलं तेव्हा लपून बसलात काय? आणि आता आल्यात कैरी खायला! मी देतेय, वाट बघा!'' असं म्हणत बबू पळाली. मैत्रिणींना त्यांची चूक कळली. त्यानंतर मात्र त्या अगदी एकोप्याने राहू लागल्या. पण पुन्हा त्यांनी चोरी केली नाही. पण बबूने मैत्रिणींना खेळाबरोबर एकत्र अभ्यासाचीही सवय लावलीय. गावात त्या हुशार मुली म्हणून प्रसिद्ध आहेत. लहानपणीची खट्याळ बबू आता अभ्यासू मुलगी झालेय. रस्त्यात मात्र कधी कधी माळीदादा भेटला की तिला विचारतो, ''काय बबूताई, कैरी हवी?'' आणि मग बबू पुन्हा भूतकाळात शिरते. म्हणते, ''आता त्या कैरीची चव कुठे येणार माळीदादा!'' आणि दोघेही हसतात.

* * *

---

लेखिकेचा पत्ता : प्रियंवदा करंडे, 'शरद', रोड नं. ३७,
वडाळा, मुंबई-३१. टे. नं.: ४१२७५१६

आवृत्ती पहिली : जानेवारी १९९१

प्रकाशक : जय हिंद प्रकाशन, झावबावाडी, मुंबई-२

ऑफसेट छपाई : सरस्वती प्रिंटर्स, चिंचपोकळी, मुंबई-११

लेझरसेटिंग : अक्षय फोटोटाइपसेटर्स, सुभाष पथ, ठाणे (पश्चिम)-१

2693 ... 78
BVBK-0402613